## सुषमा जाधव



# विहीर

# विहीर

# विहीर

सुषमा जाधव

ई साहित्य प्रतिष्ठान

पटकथा : विहीर

लेखिका: सुषमा जाधव

कथा प्रकार : भयकथा

सुषमा जाधव

संपर्क : ८६५२५४७७६९

पत्ता : 605/ बी विंग, ट्युलिप रेसिडेंसि, ताराबाई पार्क,

कारंडे मळा, सर्किट हाऊसच्या मागे, कोल्हापूर पिन -216003

sushmajadhav1967@gmail.com

या पटकथेचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : ११ जून २०१७

©esahity Pratishthan®2017

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

कल्लोळाचं पाणी

# विहीर

विहीर

नमस्कार वाचक मित्र परिवार



ई साहित्य प्रतिष्ठान द्वारे प्रकाशित झालेल्या ' पैशाचा पाऊस ' ह्या कादंबरीस, तसेच ' नांगरून ठेवलेलं शेत ' व ' विटाळ ' या कविता संग्रहास भरभरून प्रतिसाद दिल्याबद्दल आपणा सर्वांचे मनापासून आभार. लेखक म्हंटलं म्हणजे तो लिहिता असतोच.. पण वाचक त्याच्या लिखाणावर भरभरून प्रेम करणारा असेल तर त्याचा उत्साह द्विगुणित होतो. आपल्या पाठबळाने आणि एक वेगळा प्रयोग करून बघावा म्हणून मी गूढ कथेकडे वळायचे ठरवले.. गूढ कथा म्हंटले म्हणजे अंगाचा थरकाप सुटणे, दचकादचकी ... या नेहमीच्याच वळणाने जाणाऱ्या मार्गावरून न जाता जरा वेगळा प्रयोग करून बघावा असे वाटले.. आणि बऱ्याच काळापासून मनात घोळत असलेल्या कथेला ' विहीर' रूपाने तुमच्या समोर आणले आहे. एका साचेबंद लेखनात न अडकता हाताळता येण्यासारख्या लेखनाच्या सर्व प्रकाराकडे वळणे वाचकास कितपत रुचते.. त्याच्या पसंतीस किती उतरते हे जाणून घ्यायची इच्छा आहे. आपल्या अभिप्रायाच्या प्रतीक्षेत आहे.

माझी ' विहीर' ही गूढ पटकथा प्रकाशित केल्याबद्धल ईसाहित्य टीमचे मनपूर्वक आभार .

धन्यवाद .

-----------सुषमा जाधव

भय इथले संपत नाही, मज तुझी आठवण येते
मी संध्याकाळी गातो तू मला शिकविली गीते

ते झरे चंद्रसजणांचे ती धरती भगवी माया
झाडांशी निजलो आपण झाडांत पुन्हा उगवाया

तो बोल मंद हळवासा आयुष्य स्पर्शुनी गेला
सीतेच्या वनवासातील जणु अंगी राघव शेला

स्तोत्रात इंद्रिये अवघी गुणगुणती दुःख कुणाचे
हे सरता संपत नाही चांदणे तुझ्या स्मरणाचे

-ग्रेस

# विहीर

( कॉलेजचा पहिला दिवस.. मुले दंगामस्ती करत आहेत.. नितीन .. कथानायक.. आपल्या मित्रांबरोबर कॉलेजच्या कट्ट्यावर हास्यविनोद करत बसला आहे.. त्याचे लक्ष कॉलेजच्या गेटकडे जातं..)

**नितीन** : wow .... मर गया तू नितीन...

(गेट मधून एक पांढरा सलवार कुर्ता घातलेली तरुणी प्रवेश करत असते.. ठेक्यात पावले टाकत येत असलेली बघून नितीनच्या मनात व्हॉयलिन वाजू लागते.. मित्र त्याच्याकडे बघतात .. तो डोके झटकतो... ती तरुणी अतिशय सुंदर दिसत असते.. इतर मुलींसारखी नाजूक नसते... दणकट शरीरयष्टी असते.. चेहऱ्यावर कमालीचे बेफिकीरीचे भाव ... त्यांच्याकडे ढुंकूनही न बघता पुढे जाते... )

**सुदाम**: यार नितीन .. कोण आहे रे ही ?!!

**नितीन** : सुदाम्या.. आता मला जर माहित असते तर आत्तापर्यंत हाय नसते का केले लेका तिला !!... पण काय ब्युटी आहे.. मानले बुवा..

**सुदाम** : कोणाला?

**नितीन** : तिच्या बापाला...

( सगळे टाळीवर टाळी देत हसतात .. )

**नितीन** : जाऊ का?

**मित्र** : कशाला?

**नितीन** : तिचा पहिला दिवस यादगार बनवायला..

(केसातून स्टायलिशपणे हात फिरवतो) आलोच... संध्याकाळची कोकची पार्टी आपल्याकडून..

( तो तिच्या पाठीमागे चालत चालत गाणे गुणगुणू लागतो.. )

क्या खूब लगती हो.. बडी सुंदर दिखती हो...

( तरुणीच्या चेहऱ्यावरचे भाव पटापट बदलत असतात.. तरीही ती शांतपणे चालत राहते.. तिला तसं शांत चालत राहिलेले बघून नितीन अधिकच चेकाळून अजून मोठ्याने गाणे गाऊ लागतो) क्या खूब लगती हो.. बडी सुंदर दिखती हो..

( दुसऱ्याच क्षणाला ती तरुणी वळते आणि खाडकन त्याच्या कानाखाली लगावते)

तरुणी : फिर से कहो .. कहते रहो... अच्छा लगता है ...

नितीन : ( प्रचंड घाबरतो) सॉ.. सॉरी ... ( गालाला चोळतो.. गालावर लालसर वळ उमटले असतात )

तरुणी: पुन्हा माझ्याशी पंगा घेतला ना तर लक्षात ठेव ... आता फक्त गालच सुजवलाय.. नेक्स्ट टाइम चड्डीत मुतशील इतका फोडून काढीन... शाल्मली म्हणतात मला लक्षात असू दे.. काय?

नितीन : शाल्मली...

शाल्मली : गुड.. ( ती वळून टाप टाप सॅंडल वाजवत निघूनही जाते.. तरी नितीन घाबरून तसाच गालावर हात ठेऊन उभा.. मित्र हळूहळू त्याच्या भोवती गोळा होतात. )

सुदाम: बघू किती लागलंय? ( दुसरा मित्र त्याच गालावरच्या हात बाजूला करतो)

मित्र : स्स.. हाय .. पाचही बोटं उमटवीत यार ..

सुदाम: कोक घेणार ? .. गारगार.. पैसे मी देतो..

( नितीन निरागसपणे त्याच्याकडे बघत होकारार्थी मान हलवतो)

---

( कॉलेजची क्लासरूम.. मुलांची दंगामस्ती सुरु आहे... कोणी बेंच वर तबला वाजवत आहे.. कोणी समोरच्या मुलीची वेणी माईक प्रमाणे पकडून गाणे गात आहे... नितीन मोबाईल वर काही चाट मित्रांना दाखवत खदखदून हसत आहे... इतक्यात शाल्मली प्रवेश करते.. रो मधून जात असताना एक मुलगा तिच्या पायात पाय घालतो.. ती धडपडते.. अख्खा वर्ग हसतो.. तशी ती हातातली बुक त्या मुलाच्या डोक्यात जोराने मारते.... मुलाचे डोके दाणकन बेंचवर आपटते.. प्रोफेसर एंट्री करतात)

शाल्मली : ( हळूच खुन्नसने पुटपुटत) क्लास सुटल्यावर बाहेर तर पड.. बघते तुला.. नाही पाय उपटून काढला तर . ( तो पोरगा अवाक... शाल्मली तिच्या जागेवर येऊन बसते )

सुदाम : च्यायला नितीन हे रसायन वेगळंच दिसतेय... तुझी काही डाळ शिजायची नाही इथे ..

नितीन : अरे एक थप्पड से क्या होता है ... मुलीचाच हात तो... आपली बॉडी बघितली का? ( हाताचे मसल्स दाखवतो) तिचा नाजूक हात काय लागणार?!!...

सुदाम : ( एकदा तिच्या दंडाकडे ... नंतर त्याच्या दंडाकडे बघतो) नाजूक?!! .... तिच्या बापाने त्यावेळचा दंगल बघितला असणार ... पक्का.. म्हणून असा पहलवान जन्माला घातलाय... ( नितीन त्याच्याकडे बघतो)

बघू नकोस .. गालावरचे वळ बघ आरशात .. पंगा नको घेऊ भावा.... हे प्रकरण जरा वजनी दिसतंय ..

नितीन : छोड यार .. हार मानेल तो नितीन कसला?.. बघच तू... ( सुदाम त्याला वेड्यात काढल्यासारखी मान हलवतो. )

( नितीन कॉलेजच्च्या कॉरिडॉर मधून मित्रांसमवेत येत असतो.. दुसऱ्या बाजूने श्यामा तिच्या मैत्रिणींसोबत येत असते... ते जवळ येताच नितीन केसातून बोटं फिरवत शेकहॅण्ड साठी हात पुढे करतो... )

नितीन: हाय ss

श्यामा : तुझ्या तर मी... ( चिडते)

नितीन : तुला नाही.. हिला.. ( शेजारच्या मुलीकडे बोट दाखवतो.. ) हाय नेहा... कशी आहेस?

नेहा : हाय नितीन .. तू पण ह्याच कॉलेजमध्ये ऍडमिशन घेतलेस?!!

नितीन : नको घ्यायला पाहिजे होते?

नेहा : तसे नाही.. कोणती स्ट्रीम घेतलीस?

नितीन : आर्टस् .. कला... आम्ही कलेचे पुजारी आहोत.... कला कला ठासून भरल्यात ह्या कॉलेजमध्ये... आय मिन.. कला विषयातले इतके सुंदर कॉलेज मी कुठे पहिले नाही..

श्यामा : ( चिडून त्याला बोट दाखवते) ए ..

नितीन : नितीन .. नितीन म्हणतात मला ... नाम तो सुना होगा ?...

श्यामा : मस्ती नाही जिरली वाटत कानाखाली खाऊन.. दुसराही गाल रंगवू का?

नितीन : आपने कहा .. और गाल हाजीर...

श्यामा : ( भयानक चिडते .. बाकीचे मित्रही अवाक होऊन दोघांकडे बघत असतात .. सुदाम त्याचा शर्ट पाठून खेचत असतो... ) नेहा, आता हा माझ्या डोक्यात जातोय हां ....

नेहा : नितीन, काय प्रकार आहे हा ? आणि श्यामा तू का चिडतेयस त्याच्यावर?!!

( श्यामा जिन्याच्या एकदम कडेला उभी असते.. रागाने निघायला वळते आणि तोल जाऊन पडते.. इतक्यात नितीन पटकन तिचा हात धरून खेचतो .. त्याचा हात तिच्या कंबरेभोवती आणि तिचे हात त्याच्या गळयाभोवती.. अशा अवस्थेत दोघेही उभे असतात .. व्हॉयलिनचा आवाज बॅकग्राउंड मध्ये .. सुदाम शिटी मारतो.. )

नितीन : नितीन .. नाम तो सुना होगा .. ( हलकेच डोळा मारतो.. तशी श्यामा मिश्किल हसते .. शेकहॅण्ड साठी हात पुढे करते ... )

श्यामा : थँक्स .. मी शाल्मली..

नितीन : श्यामा .. श्यामाच ... फॉर मी...

( दोघेही हात मिळवतात ... सगळे हुर्ये ओरडतात .. )

---

(श्यामाचे घर.. दारावर 'अन्नपूर्णा टिफिन्स' चा बोर्ड लटकत आहे.. २ बेडरूमचे घर.., हॉलला लागून छोटीशी बाल्कनी .. बाल्कनीला लागूनच आतल्या बाजूला एक छोटा पलंग .. किचन मध्ये टिफिन्स एकाला एक लागून ठेवलेले.. तिचे बाबा टिफिन भरायला मदत करत आहेत.. आई भजी तळत आहे.. श्यामा भावंडांबरोबर प्लेट मध्ये भजी घेऊन खात आहे... जोराच्या वाऱ्याने खिडकी जोरात आपटते ... )

श्यामा : बाबा, हि खिडकी लवकर रिपेअर करून घ्या ना.. कड्या किती गंजल्यात .. सारखे बाहेरून दोरीने बांधावे लागते.. ( ती उठून बाहेर बाल्कनीत जाते आणि बाहेरच्या खिळ्याला दोरीने खिडकीच्या कडीला बांधते .. )

बाबा : सांगितलेय ग सुताराला.. पण केवळ एवढ्याच कामाला यायला मागत नाही कोणी... दुसरे काम निघाले ह्या बाजूला कि येईल तो.. रशीने बांधून टाक तोपर्यंत..

श्यामा : ( किचनमध्ये येते) तेच केले ... काच निखळेल एके दिवशी ... आई काय बनवलंय.. मस्त गोड वास येतोय.. ( पातेल्यावरचे झाकण काढून बघते... गुलाबजामून ... ( एक उचलून तोंडात टाकते.. आई ओरडते)

आई : अगं अगं .. असं उष्टावू नकोस जेवण ... लोकांना जायचं आहे जेवण..

श्यामा : पण हे जेवण नाही.. गुलाबजामून आहेत माय डियर मॉम .. ( तशाच पाकने भरलेल्या ओठांनी ती आईच्या गालाची पप्पी घेते)

आई : काय पोरगी आहे हि...

श्यामा : मस्त पोरगी आहे...

(शमू ss  बिल्डिंगच्या खालून नेहाचा आवाज येतो... श्यामा बाल्कनीत येऊन बघते .. नेहा स्कुटीवरुन  तिला हात करत होती. ती मागे दुसऱ्या बाईकवर बसलेल्या नितिनकडे बोट दाखवून खुणावते. आणि हलकेच डोळा मारते.  श्यामाने तोंडावर बोट ठेऊन तिला गप्पं राहण्याची खूण केली.

नेहा : लवकर ये .. उशीर होतोय..

श्यामा : आले आले... ( तिने सॅक खांद्यावर लटकवली.. ) आई, येते ग मी ...

आई : अगं टिफिन घेऊन जा..

श्यामा : आई .... अगं कॉलेजला जाते आता मी... शाळेला नाही.. तू पण ना !! आणि हो, उशीर होईल आज यायला.. फेस्ट आहे आज .. बा ss य ..

( दरवाजा उघडून ती बाहेर पडते .. दोन दोन पायऱ्या उतरून ती खाली येते. )

श्यामा : तुम्ही लोकं पण ना यार.. टू मच आहात... एकदम बिल्डिंग पर्यंत यायची काय गरज होती?!! बाबानी बघितलं तर ?

नेहा : कोण नाही बघत .. तू उगाच घाबरतोस .. चल बस पाठी.. पुढे गेल्यावर त्याच्या बाईकवर बस.

( नेहा हसते .. नेहाच्या मागे बसत श्यामने वर आपल्या बाल्कनीकडे बघितलं .. तिची आई तिला हात करत उभी होती.. श्यामा सहेतुक नेहाकडे बघते .. श्यामा आई ला बाय करते.. सर्व तिथून निघतात. )

( पुढे गेल्यावर नेहा बाईक थांबवते )

नेहा : हं .. उतरा बाईसाहेब .. जा आपल्या जागी .. का बसतेस इथेच?

( श्यामाने हसून तिच्या डोक्यावर टपली मारली आणि ती नितीनच्या पाठी बसली.. बाईक रोडवरून निघाल्या....

श्यामाने नितीनच्या कंबरेभोवती हात लपेटला.. आणि हळूच त्याच्या खांद्यावर मान टेकवली ... त्याच्या गालावर गाल घासत तिने डोळे मिटले.. )

नितीन : काय मॅडम, मूड एकदम फ्रेश दिसतोय?

श्यामा : मग काय .... तुझ्याबरोबर असं मस्त गार गार हवेत .. बाईकवरून राईड करायची म्हंटलं किती अंग कसं पिसासारखं हलकं होऊन जातं...... एकदम हवेतच ... ( ती उभी राहते आणि हात फैलावत खोलवर श्वास घेते .. )

नितीन : ये बाई.... खाली बस आणि नीट घट्ट पकडून बस .. नाहीतर पडशील मागच्या मागे

श्यामा : ( हसून त्याला पुन्हा घट्ट पकडते) असं ?

नितीन तू ना.... ( ती खळखळून हसू लागते ... नेहा त्यांच्या बरोबरीने बाईक चालवू लागते)

नेहा : ए रोमिओ ज्युलिएट ... तुमचा रोमान्स नंतर करा.. सिद्धार्थ पुढे वेट करतोय म्हंटलं ... त्याला पिकअप करून पुढे जायचं आहे... बाकीचे पण वाट बघत असतील ... लवकर चला जरा.. स्पीड वाढवा ..

( श्यामा तिला जीभ काढून वेडावून दाखवते.. गाड्या वेगाने जातात ... काही वेळाने सिद्धार्थ आणि त्यांचे इतर मित्र मैत्रिणी एका वळणावर त्यांची वाट बघत असलेले दिसतात ते गाड्या थांबवतात )

नितीन : हाय सिद्धार्थ .. हॅपी बर्थडे ...

सिद्धार्थ : उशीर का रे केलास ? नऊ इथेच वाजलेत.. बंगल्यावर पोहोचायलाच दहा वाजतील..

नितीन : पोहोचू रे.. घाई काय आहे?... आपली बाकी पलटण कुठेय?

सिद्धार्थ : ते आधीच पुढे गेलेत .. अरेंजमेंट नीट झाली कि नाही बघायला .. हो पण जेवणं झाली कि लगेच निघायला हवं आपल्याला .... चार वाजेपर्यंत घरी पोहोचायला हवं...

नेहा : इतक्या लगेच ?!!

सिद्धार्थ : घरी माझा परिवारही आहे बाबांनो ... त्यांनाही माझा बर्थडे सेलिब्रेट करायचा आहे...

नेहा : ओके ओके ... सॉरी ... पण आहे भरपूर वेळ आपल्याकडे ... बोलण्यात काय वेळ घालवता .. चला निघा ...

(सगळे निघतात ... )

---

ते पोहोचले तेव्हा सर्वजण त्यांचीच वाट बघत होते... बंगला आतून मस्त सजवला होता ... डीजे लावला होता ... लॉन मध्ये मंडप बांधून आचारी मंडळी जेवण बनवत होती... जेवणाचा मस्त सुवास दरवळत होता .. चारी बाजूला गर्द झाडी... फुलांचे ताटवे पसरलेले होते... श्यामा हरखून बघत राहिली )

श्यामा : वॉव... काय सुरेख बांगला आहे !! कुल यार ....

( खोलवर श्वास घेते) यमी.. लॉलिपॉप्स ... नितीन, सिद्धार्थ ने मस्त अरेंजमेंट केलीय नाही... कसं मॅनेज केलं याने?!

नितीन : अगं पूर्ण वर्षभर सेविंग करत होतो आम्ही.. तेव्हा कुठे जमून आलं हे... नाहीतर हजार रुपयेही खर्च करायचे म्हंटले तरी फाटते याची.. (हसतो)

सिद्धार्थ : बस क्या यार ?... पोरींसमोर कशाला इज्जत काढतोस...

नितीन : कम ऑन यार... मस्करी केली.. सगळे आपलेच आहेत.. आणि सगळे कडके ही.. लेट्स एन्जॉय पार्टी ... ए .. आवाज वाढव डीजे तुझ्या .....

( सगळे एन्जॉय करत नाचतात.... )

---

( लॉन मधील खुर्चीवर बसून जेवता जेवता श्यामा व नितीन बोलत आहेत.. इतर मित्र मैत्रिणी ही जेवत आहेत )

श्यामा : नितीन ?

नितीन : हं ?

श्यामा : वर्ष झालं नाही रे आपल्या मैत्रीला ?

नितीन : हो? माझ्या नाही लक्षात ...

श्यामा : ए .. चेष्टा नको करुस हां.. ( लटक्या रागाने बोलते)

नितीन : मग आता काय बोलू ?!! अशी बोलतेस जणू दहा बारा वर्षे झालीत..

श्यामा : खरंच रे .. किती फास्ट गेले नाही दिवस !! कळलेही नाही ..

नितीन : ( गालावर हात नेत ) पण माझ्या मात्र चांगलंच लक्षात आहे .. आई शप्पथ, काय पण आवाज काढला होता .. ( श्यामा खळखळून हसते ) हसा हसा ... काय खाऊन आली होतीस गं त्या दिवशी? !! महिनाभर गालच काय .. दातही ठणकत होते..

श्यामा : मग काय पूजा करणार होते तुझी? .. म्हणे क्या खूब लगती हो... टिंगल टवाळी करणारी मुलं बघून डोक्यातच राग जातो माझ्या... मुली पटवायचा हा फंडा आता जुना झालाय ... आजकालच्या मुली असल्या पांचट गाण्यांना भीकही घालत नाहीत.. गाण्यांनी पोट भरत नाही... रफीचे वंशज नाहीत तुम्ही ज्याच्या बरोबर आयुष्य काढायचं त्याच्या बरोबर सुरक्षित तरी वाटलं पाहिजे..

नितीन : व्वा.. हे बरं आहे.. तुम्हा पोरींची इतकी स्तुती करतो आम्ही..

---

श्यामा : आरसा रोज बघतो आम्ही... आमचे सौदर्य आम्हाला माहित असते.. तुमच्या स्तुतीने लगेच पाघळत नाहीत आम्ही... छपरी पोरांच्या नादी लागून आयुष्य बरबाद करण्याइतक्या मूर्ख नसतो आम्ही... कष्ट करून दर्जा उंचावणारी पोरं लगेच कळतात ...

नितीन : मग मी कसं वाटलो तुला ...

श्यामा : बच्चा आहेस अजून.. ( ती मिश्कीलपणे बोलते.. नितीन अवाक होऊन तिच्याकडे पाहात राहतो आणि ती खळखळून हसते.. )

---

( सगळेजण बाईकवरून गल्लीबोळातून होत एका चाळीसमोर थांबतात )

श्यामा : ( बाईकवरून उतरते) हे कुठे आलो आपण ?

सिद्धार्थ : मालाड .. मी इथे राहतो,, बद्रुद्दीन चाळीत.. ते समोर माझे घर .. घर छोटंसंच आहे माझं .. त्यामुळे बाजूच्या घरात तात्पुरती बसण्याची व्यवस्था केलीय... ती लोकं फिरायला गेलीत,, त्यामुळे आजच्या दिवस वापरायला दिली.. सो प्लिज ..

नितीन : कम ऑन यार .. दिल बडा होना चाहिये ...

( श्यामाची नजर बाजूच्या घरावर खिळते.. त्या घराला बाहेरून कडी लावली असते .. ती पुढे होऊन त्या घराच्या दरवाजाची कडी काढते.. एक गार हवेचा झोत तिच्यावर येतो.. त्या गरमीतही ती शहारले )

सिद्धार्थ : ( प्रचंड घाबरून) अरे श्यामा .. ती खोली नाही .. ही ह्या बाजूची.. कडी लाव पटकन ... तिथे कोणी जात नाही.... पटकन कडी लाव... ( तो घाबरून ओरडतो.. )

श्यामा: ( आश्चर्याने ) किती घाबरतोयस .. चिल्ड .. ( ती कडी लावते) झपाटलेलं घर असल्यासारखं बोलतोयस .

सिद्धार्थ : तसं समज हवं तर ... तसंच आहे.. चला ...

( श्यामा एक नजर त्या बंद घराकडे टाकते आणि ते सगळे दुसऱ्या घरात शिरतात... त्या बंद दाराआडून पाणी पडल्याचा आवाज यायला लागतो... )

-----------

(श्यामाचे घर ... श्यामा आईच्या पाठीपाठी फिरत आहे.. )

श्यामा : आई ... मला खूप भूक लागली .. काहीतरी खायला दे ना ..

आई : तरी सकाळी उठून नाश्ता करत जा बोलत असते .. पण ऐकशील तर ना ... ह्या वयात कसं वेळच्यावेळी उठावं... तब्येतीची हेळसांड करू नये .. पुढे भारी पडतं मग ... थांब जरा, शिरा करून देते ...

श्यामा : ई ss गोड नको काही.. उपमा कर .. छान वाटणे टाकून.. झणझणीत ...

आई : बरं बाई ... थांब जरा वेळ ...

श्यामा : मी तोपर्यंत स्टडी करते .. असाइनमेंट सबमिट करायच्यात .. नोट्स काढते ...

आई : ठीक आहे .. जा अभ्यास कर.. बनवते तोपर्यंत..

( श्यामा बाहेरच्या खोलीत येऊन नोट्स काढते.. आई रवा भाजायला घेते... बराच वेळ शांततेत जातो.. श्यामा नोट्स काढण्यात तल्लीन झालेली आहे... आणि अचानक ती कॉटवर कोसळते.. एक हात गालावर धरून कळवळते. )

श्यामा : आई ss गं...

आई : ( आतूनच) काय झालं गं?

श्यामा: अगं कोणीतरी कानाखाली मारली माझ्या ...

( ती घरून इकडे तिकडे बघते )

आई : वेडी आहेस काय?! भर दिवसा भास व्हायला लागले कि काय तुला ?!!

श्यामा : अगं नाही .. खरंच ... खरंच कोणीतरी थोबाडीत दिली माझ्या ...

( ती घाबरून कॉटवरून  उठून किचनमध्ये येते )

आई : हे घे उपमा ( प्लेट तिच्या हातात देते) पोटात काही नसलं तर तू बेचैन होतेस.. लहानपणापासूनची सवय आहे तुझी ( आई हसत बोलते) खाऊन घे पोटभर .. म्हणजे भास होणार नाही..

श्यामा :  तू पण चाल ना बाहेर .. थांब मी भरते तुझी प्लेट... ( आईची प्लेट घेऊन ती बाहेर येते.. दोघीही हॉलमध्ये बसून जेवतात .. श्यामाची नजर सर्वत्र भिरभिरत असते.. )

---

( पिकनिक सीन.. कॉलेजची पिकनिक ... श्यामाच्या कॉलेजची पिकनिक .. सर्व मुले एका तलावाकाठी बसलेत.. काही अंताक्षरी खेळत आहेत.. काही मुली बॅडमिंटन खेळत आहेत.. काही तलावात पोहत आहेत प्रोफेसर मंडळी एकमेकांशी गप्पा मारत हास्यविनोद करत आहेत मधेच एक प्राध्यापिका उठून उभी राहात मुलांना हात करते..

प्राध्यापिका : हॅलो स्टुडंट्स ... तलावात जास्त आत जाऊ नका.. उगाच रिस्क नको .. आणि ज्यांना पोहायला येत नाही त्यांना तर अजिबात पाण्यात नेऊ नका..

सर्व एकसाथ : येस्स मॅम.. डोन्ट वरी\...

नेहा : या रजनी मॅम ना !!.. इथेही लेक्चरगिरी थांबत नाही यांची.. पिकनिकला आलोय हेही कळत नाही यांना .. सारख्या लक्ष ठेऊन असतात ..

श्यामा : ए .. उगाच काय सारखी नावं ठेवतेस त्यांना .. मुलांची जबाबदारी असते त्यांच्यावर .. काही झाले तर आपले पेरेंट्स त्यांचा गळा पकडायला मोकळेच असतात .. एखादा बुडाला म्हणजे? मरेपर्यंत त्याची वाट बघायची का?

नेहा : ( हात जोडते ) हो गं प्रोफेसरीन बाई ... आता तू नको सुरु होऊस .. बाय दि वे .. मी पोहायला जातेय .. कोण कोण येतंय सोबत? .. श्यामा तू पण चल ना.. तुला तर पोहायला येते...

श्यामा : तू हो पुढे आम्ही जरा फेरफटका मारून येतो..

( नितीनकडे सहेतुक बघते)

सर्व : ओय होय ss

( दोघे फिरायला जातात ... एकमेकात रममाण झालेले ते प्रेमी युगुल काहीवेळाने परतते तेव्हा नेहा आणि इतर फ्रेंड्स त्यांना पोहायला येण्याचा इशारा करतात .. नितीन आणि श्यामा दोघेही पाण्यात उतरतात ... एकमेकांच्या अंगावर पाणी उडवत ते एन्जॉय करत असतात ... अचानक श्यामा जोरात किंचाळते.. पाण्यात जोरजोरात हातपाय मारायला लागते .. गटांगळ्या खायला लागते ... बुडायला लागते... )

श्यामा : नितीन .. वाचव मला... ( पुन्हा बुडते.. परत वर येते) वाचवा .. कोणीतरी खेचतंय मला पाण्यात ... प्लिज वाचवा मला.. ( ती पुन्हा बुडू लागते... सगळे तिच्या रोखाने पोहू लागतात... एव्हाना ती पाण्यात बुडालेली असते .. नितीन पाण्याच्या आत जाऊन तिला खेचून वर आणतो... सर्व मिळून तिला काठावर आणतात .. सगळे घाबरलेले असतात ... श्यामा धापा टाकत घाबरून तळयाच्या दिशेने बघत राहते .. )

---

( श्यामचे घर .. श्यामाची भावंडं खेळत आहेत... बाबा पेपर वाचत आहेत ... आई साफसफाई करत आहे.. डोअर बेल वाजते. आई पुढे होऊन दरवाजा उघडते .. श्यामा आणि तिचे फ्रेंड बाहेर उभे असतात.. श्यामा अत्यंत घाबरलेल्या अवस्थेत... आईला बघून रडायला लागते.. )

आई : ( घाबरून ) काय झालं हिला ? ... काय गं .. काय झालं ?

नेहा : काकी आमची पिकनिक गेली होती ना.. तिकडे एक तलाव होता.. आम्ही सर्व पोहायला गेलो.. श्यामा पण आली... अचानक काय झालं माहित नाही... ही जोरजोरात किंचाळायला लागली.. बघतो तर ही बुडत होती.... नशीब आम्ही आसपासच होतो.. नितीनने बाहेर काढली हिला.. नाहीतर आज काही खरं नव्हतं..

आई : अशी कशी बुडायला लागली?!! हिला तर चांगलंच पोहायला येतं... तिच्या बाबांनी नदीत पोहायला शिकवलं आहे .. लहानपणीच.. आमच्या गावच्या नदीत ... बुडणं शक्यच नाही...

नेहा: तेच तर कळत नाही काकी .. हातपायही हलवत नव्हती ... कशीबशी खेचून बाहेत काढली..

( बाबानी तिच्या अंगाभोवती ब्लॅंकेट लपेटल .. तरीही तिचे कुडकुडणे थांबेना.. )

श्यामा : खूप थंडी वाजतेय आई ..

नेहा : काकू मी कॉफी करून देते तिला .. ( नेहा किचनमध्ये जाते .. गरम गरम कॉफी करून आणते.. श्यामा कॉफी पिऊ लागते .. हात प्रचंड थरथरत असतात.. बाबा तिच्या कपाळावर हात लावून बघतात. )

बाबा : अरे बापरे .. बर्फासारखं अंग गार पडलंय हिचं !!

नेहा : काका, कॉफी पिल्यावर बरं वाटेल तिला .. गरम गरमच पी... (तिची आई तिचे पाय हाताने रगडु लागते .. बऱ्याच वेळाने तिला बरं वाटू लागतं.. ती बऱ्यापैकी सावरते ... आई बाबा तिच्याकडे प्रश्नार्थक नजरेने बघत असतात ... )

श्याम : मी पोहत होते गं मस्त .. अचानक कोणीतरी माझे पाय खेचत असल्याचं जाणवलं.. भास तरी कसा म्हणू मी.. खरंच कोणीतरी पाण्याखालून माझे पाय गच्च पकडून ठेवले होते.. मी अजिबातच पाय हलवू शकत नव्हते.. कोणीच दिसत नव्हत पाण्याखाली... मला वाटलं पाण्यातल्या वेली वगैरे असतील.. पण मी खाली खेचले जात होते .. पाणी अचानक बर्फासारखं थंड वाटायला लागलं.. पाण्याचं टेम्परेचर अचानक कसं बदलल.... मी पूर्ण गोठून गेले होते .. मोठ्या मुश्किलीने ओरडले.. तोपर्यंत पाण्याच्या आत खेचले गेले.. शुद्धच हरपली माझी... शुद्धीवर आले तेव्हा मला पाण्याच्या बाहेर काढलं होतं... भयंकर होतं ते सर्व .. ते पाणी... जणू मला बाहेरच जाऊ देत नव्हतं ते असं वाटत होतं .. ( ती भीतीने शहारले )

नेहा : तू अजून शॉक मधून बाहेर आली नाहीस.. त्यामुळे असं वाटत असेल... शांत पडून रहा, म्हणजे बरं वाटेल.. होतं यार असं कधीकधी.. इट्स ओन्ली ऍक्सीडेन्ट.. बाकी काही नाही.. आराम कर .. वाटल्यास उद्या येऊ नकोस.. पण पर्वा मात्र आठवणीने ये.. एक्साम्स आहेत नेक्स्ट वीक मध्ये .. लेक्चर्स मिस नको करायला.. इंम्पॉर्टन्ट नोट्स देणार आहेत टीचर्स ... ओके.. ( श्याम होकारार्थी मान हलवते) गुड .. बाय"

श्यामा : बाय .. ( सगळे जातात ... आई तिच्या अंगावर अजून एक चादर टाकून तिला झोपवते... श्यामा डोळे मिटते)

---

( मध्यरात्रीची वेळ .. श्यामाचे घर .. सर्वजण झोपले आहेत .. श्यामा कॉटवर झोपली आहे.. मंद निळा ब्लबचा प्रकाश खोलीत पसरलेला आहे... गाढ झोपेत असताना खूप खोल खोल फेकले जात असल्याचे तिला जाणवू लागले. अधांतरी खोल खोल कोसळत असताना अचानक थंडगार पाण्याचा स्पर्श तिच्या सर्वांगाला जाणवू लागला .... ती दचकून उठली... तसे बेडरूमच्या खिडकीकडे तिचे लक्ष गेलं... कोणीतरी रोखून बघतंय असं क्षणभर तिला वाटलं.. विचित्र धुकं बाहेर पसरलं होतं .. उन्हाळ्याचे दिवस आणि धुकं ?!! एक थंडगार पाणवट हवेची झुळूक आत आली आणि अचानक घशात प्रचंड जळजळ सुरू झाली. काही क्षण तिने दोन्ही हातांनी गळा आवळून धरला ... श्यामा कासावीस होत डोके इकडे तिकडे हलवू लागते... चेहरा घामाघूम.... अगदीच असह्य झालं तेव्हा तिच्या तोंडून किंकाळी बाहेर पडली. तसा खिडकीबाहेरचा गढूळलेला प्रकाश साफ झाला.... )

श्यामा : आई ग sss ( श्यामा जोरात किंचाळत उठली. तिच्या किंचाळण्याने सगळेच खडबडून जागे झाले होते. )

आई: काय झालं ग ? ( आईने घाबरून तिला हलवत विचारलं. श्यामाने गळा गच्च धरला होता.. आणि जोरजोरात किंचाळत होती . तिचा चेहरा वेदनेने कासाविस झाला होता. )

श्यामा : आई, पाणी दे.. गळा खूप जळतोय ग आतून .. आग आग होतेय.. लवकर थंड पाणी दे.. असं वाटतं कोणी लाव्हा ओतलाय आत . लवकर दे प्लिज ... ( ती कासावीस होत सारखा गळा चोळू लागली. तिचे वडील काहीच न कळून गप्प राहिले....

चेहऱ्यावर भलंमोठं प्रश्नचिन्ह .. छोटी भावंडं घाबरून वडिलांना बिलगली होती. आईने लगबगीने किचनमधून पाणी आणून तिला दिले . श्यामाने एका दमात आख्खा तांब्या रिकामा केला . )

श्यामा : आई ग, किती जळतोय घसा आतून .. सहन होत नाहीय . आई ग, काहीतरी कर ना ( ती रडू लागली. तशी तिची आई पण रडायला लागली. )

आई : अहो काय होतंय बघा ना पोरीला.. अशी काय करतेय ही.... दोन वाजलेत रात्रीचे.. ह्या वेळी डॉक्टर कुठून मिळणार?!! काय होतंय पोरीला कळत नाही. ”

बाबा : मलाच कळेनासं झालंय... या आधी तर असं कधी झालं नाही. आपल्या फॅमिली डॉक्टरला फोन करतो. "

आई : देवा, बरं वाटू दे रे माझ्या पोरीला.. असं छळू नकोस रे बाबा .. काय पीडा लागलीय मागे.. परमेश्वरा ठीक कर रे ... (आईने देवाच्या फोटोला हात जोडले. कसल्याशा आशंकेने ती चमकली. पटकन उठून तिने फोटोजवळची जपमाळ काढून आणली आणि प्रार्थना करून श्यामाच्या गळयात घातली . जपमाळ घालताच श्यामाच्या चेहऱ्यावरचे भाव बदलले . वेदनेचा लवलेशदेखील तिच्या चेहऱ्यावर राहिला नाही. मात्र घामाने पार डबडबून गेली होती. )

श्यामा : आई अजून पाणी दे ग..

(पुन्हा पाणी पिऊन ती डोळे मिटून भिंतीला टेकून बसली.

आई : काय होतंय ग बाळ ? बरं वाटतंय का आता?" आईने तिच्या केसावरुन हात फिरवत विचारलं .

...

( एव्हाना श्यामा सावरली होती. मघाचची घशाची जळजळही थांबली होती. तिने पुन्हा खिडकीकडे बघितलं. स्वच्छ चंद्रप्रकाश खिडकीतून आत येत होता... मग मघाशी तो गर्द अंधार !!... आणि त्या अंधारातून रोखून बघणारे ते अस्तित्व !!... तिच्या अंगावर काटा उभा राहिला ) "

श्यामा : काहीच कळत नाही ग आई ... असं वाटत होतं घशात कोणीतरी जळते शिसं ओतलंय... भाजून निघत होता  घसा... अतिशय वेदना होत होत्या . तू जपमाळ घातलीस आणि लगेच थांबलं बघ. असं का होतंय आई ?!!

आई : तुला स्वप्न पडलं असेल ... पाणी पिऊन झोप, म्हणजे शांत झोप लागेल. तुम्ही पण झोपा रे पोरांनो ... सकाळी शाळेला जायचंय ना . झोपा... ( आई पोरांवर खेकसली तशी ती दोघे तोंडावर चादर घेऊन झोपले. )

श्यामा : आई, मी तुला सांगितले नाही .. पण मला गेल्या काही महिन्यांपासून असा त्रास होत आहे.... पाच सहा महिन्यांपासून ... सगळे हसतील म्हणून गप्पं राहिले. पण आज... मी खूप घाबरून गेले आहे ग.. मी काय असं कोणाचं वाकडं केलं आहे?!! ... असं का होतंय माझ्याबरोबर ?!! काल पिकनिकला गेल्यावर तो प्रकार !!.. काय प्रकार आहे हा?

(एवढा वेळ गप्प असलेल्या वडिलांच्या चेहऱ्यावर आता चिंतेचे भाव दिसू लागले. )

बाबा : पोरी, तू देवाचा फोटो उशाशी घेऊन झोप ... मी उद्या सकाळी विचारतो कोणाला तरी...

आई : कोणाला?!! काय विचारणार?!! (आईने न कळून विचारलं . )

बाबा :काही नाही ... झोपा तुम्ही शांतपणे ... उद्या बोलू आपण सकाळी ... फोटो ठेव देवाचा पोरीच्या उशाशी..

(आईने गणपतीचा फोटो श्यामाच्या उशीखाली ठेवला आणि तिच्या केसावरुन हात फिरवत तिला थोपटू लागली. बघता बघता ती झोपेच्या अधीन झाली. वडिलांनी खुणेनेच आईला झोपायला सांगितले. अंगावर चादर घेता घेता त्यांनी खिडकीकडे नजर टाकली . स्वच्छ चंद्रप्रकाशाकडे बघता बघता त्यांनी उद्या खिडकीला पडदे आणि कड्या लावण्याचे मनोमन ठरवून टाकले. त्यांनी डोळे मिटले तेव्हा बाहेर चंद्रप्रकाशावर काजळी पडू लागली होती.... )

(श्यामा सकाळी उठली तेव्हा तिच्या चेहऱ्यावर नेहमीचेच प्रसन्न हसू होते . लहान भावंडांच्या अंगावरची चादर खेचत तिने थोडावेळ त्यांच्याशी दंगामस्ती केली... )

श्यामा : आई, गरम पाणी काढले का अंघोळीला ?

आई : कधीचेच काढलंय... जा, लवकर जा... तुमची मस्ती आटोपली नाही तर थंड होऊन जाईल.... पुन्हा तापवावे लागेल... ( तरीही ते तिघे अंगावर उशा फेकून किंचाळत होते.. ) अरे पोरांनो बस करा... शाळेला उशीर होईल.. श्यामा तू पण ऐकत नाहीस एकेकदा ... कधी सुधारणार देव जाणे...

श्यामा : नेव्हर .. मस्ती करणं हा आम्हा मुलांचा जन्मसिद्ध अधिकार आहे... आणि तो आम्ही मिळविणारच... (आईने कपाळावर हात मारून घेतला... )

आई : कसं होईल या पोरीचं कळत नाही.. नवऱ्याच्या घरी जाऊन अशीच मस्ती करणार आहेस का तू ?

श्यामा : याहीपेक्षा जास्त करणार .. ( तिने जीभ चावली.. ).

आई : लाज लज्जाच नाही पोरीला .. जा पटकन अंघोळ करून घे .. तोपर्यंत मी पोहे बनवते.

श्यामा : ओके मदर.. ( टॉवेल अंगावर घेत तिने पटकन आईच्या गालाची पप्पी घेतली. ) माय डिअर स्वीट मदर . ( आईच्या गळयाभोवती हाताचा विळखा घालत तिने तिच्या खांद्यावर डोके टेकवले. )

आई : जा बाळ, अंघोळ करून घे.. उशीर होईल तुला.. आता बरं वाटतंय ना? "

श्यामा : हो ... एकदम मस्त... आता गळयाची आगही होत नाहीय .. ( गळयावरून हात फिरवत ती म्हणाली. आईने तिच्या गळयाकडे बघतलं आणि घाबरून तोंडावर हात ठेवला. )

श्यामा : काय झालं आई?!! .. आई .. काय ग झालं ? " (ती आईच्या घाबरलेल्या चेह्ऱ्याकडे आश्चर्याने बघू लागली. )

आई : तुझा गळा !! ... तुझ्या गळयाला.... ( तिच्या गळयाकडे बोट दाखवून ती चाचरत बोलली ).

श्यामा : काय झालंय माझ्या गळयाला?!! अगं आता मला जळजळत नाही... ( आईच्या भयाने विस्फारलेल्या डोळयांकडे बघून तिला रात्रीचा प्रसंग आठवला ... कसल्याशा शंकेने तिच्या अंगावर सर्रकन काटा आला. पळतच ती कपाटाच्या आरशापुढे उभी राहिली. आणि भीतीने तिचे डोळे विस्फारले... )

श्यामा : अरे बाप रे SS ... ( श्यामा घाबरून गेली. तिच्या गळयावर भाजल्याचे लालसर डाग दिसत होते ... तिने हात लावून बघितला ... पण तिथे वेदना होत नव्हत्या ... चरचरून चटका बसल्यावर जसे डाग उमटतात तसे गळयावर उमटले होते... (मनातल्या मनात ). हा काय प्रकार आहे?!! भुताटकी तर नाही?... पण आपण कुठे अशा गोष्टींना मानतो... माणसासारखं मोठं भूत कुठे नसेल.. ती त्याही स्थितीत हसू लागली .... काय चाललंय हे माझ्याबरोबर ?!! कोण छळतंय असं? .... बाबा पाठी येऊन उभे राहिले तरी तिला कळलं नाही . त्यांनी तिच्या खांद्यावर हात ठेवला.... तशी ती भानावर आली. ) बाबा, बघा ना काय होतंय ... खूप भीती वाटत आहे मला.

बाबा : तू काही काळजी करू नकोस बाळा... होईल सर्व ठीक... आपण कोणाचं काही वाईट केलं नाही.. देव आपलंही वाईट करणार नाही. तू जा कॉलेजला ... संध्याकाळी आपण एका व्यक्तीकडे जाऊ... मोठे साधक आहेत ते. काहीतरी उपाय नक्कीच सांगतील. "

श्यामा : कोण बाबा ?"

बाबा : अवधूत साने ... खूप मोठे साधक आहेत .. माझे मित्रही आहेत चांगले "

श्यामा : ते काय करतील?!"

बाबा : काहीतरी उपाय नक्कीच सांगतील. सामान्य माणसाला ज्या गोष्टी अशक्यप्राय असतात .. कल्पनेपलीकडील असतात, त्या गोष्टी अशा साधकांना सहज शक्य होतात. "

श्यामा : म्हणजे तुम्हाला म्हणायचंय की हे जे होतंय ते जादूटोण्याचा प्रकार आहे?!!"

बाबा : नक्की सांगू शकत नाही मी... पण काहीतरी अमानवीय आहे हे मात्र निश्चित... तुला बरं वाटत नसेल तर जाऊ नकोस कॉलेजला .

श्यामा : नाही, मी ठीक आहे .... तसेही आज महत्वाचे लेक्चर्स आहेत... मीस नाही करू शकत .. परीक्षा तोंडावर आलीय... मी जाते ... आपण संध्याकाळी जाऊ. "

बाबा: हं... जा तू, अंघोळ करून घे... मी सोडतो तुला कॉलेजमधे . "

ती बाथरूम मध्ये गेली.

********************************************

नेहा : हाय श्यामा.... "

(श्यामाला स्कुटीवरून उतरताना बघून तिचे सगळे फ्रेंड्स धावत जवळ आले. श्यामाने पटकन गळ्याभोवती स्कार्फ गुंडाळला . )

नितीन : हे श्यामा, उशीर का केलास? फर्स्ट लेक्चर मीस झाले तुझे.

श्यामा : सॉरी, पण जरा उशिरच झाला आज उठायला . रात्री झोप पूर्ण नाही झाली.

नेहा : एनी थिंग इज रॉंग ? तब्येत ठीक नाही का तुझी? अजूनही पिकनिकचा प्रसंगातून बाहेर आली नाहीस का? (नेहा काळजीने बोलली . )

श्यामा : ठीक आहे मी ... बाबा, निघते मी... सेकंड लेक्चर बुडायला नको.... या तुम्ही.

बाबा : बरं येतो मी ... मला फोन कर म्हणजे तुला न्यायला येतो मी...

श्यामा : ठीक आहे बाबा

(ते निघून गेले तसा नितीन तिच्याकडे वळला ).

नितीन : what happened yaar ? any serious ? तुझे बाबा यापूर्वी कधी तुला सोडायला किंवा न्यायला आले नाहीत .. शिवाय प्रचंड टेन्स मध्ये दिसले...

श्यामा : सांगते नंतर तुला .. आधी लेक्चर अटेंड करू दे... चल

नितीन : ओके .. बाय दि वे, तुझे नोट्स देतो नंतर तुला..

श्यामा : हं .. (ती शांतपणे जिने चढू लागली. तोही तिच्या गंभीर चेहऱ्याकडे बघून काही बोलला नाही. तिच्या पाठोपाठ चालू लागला. तिचे इतर फ्रेंड्स काय झालं.. म्हणून एकमेकांना खुणावू लागले. नितीनने तोंडावर बोट ठेऊन गप्पं राहण्याची खूण केली. )

*******************************************

(श्यामा आणि तिचे सगळे फ्रेंड्स कॉलेजच्या कँटीनमध्ये बसले होते. )

नितीन : काही खाल्लंस का तू घरून निघताना ?( तिने नकारार्थी मान हलवली . ) काय खाणार बोल.. सॅन्डविच खाशील?

श्यामा : हं

नितीन : चला रे .. तुमची पण सेवा करू काय मी... उठा... पोरी बघितल्या की चिकटली ह्यांची बूड ...

(पोरी फिदीफिदी हसू लागल्या.. मित्र ओशाळून उठले. थोड्याच वेळात सगळे नाश्त्याच्या प्लेटा घेऊन आले. )

नितीन : हे घे .. तुझी फेव्हरेट फिल्टर कॉफी पण आणलीय.. शमू, लक्ष कुठे आहे तुझं?

( नितीनने तिच्या तोंडासमोर टिचकी वाजवली. )

श्यामा : अं.. काय म्हणालास? ( भानावर येत ती बोलली. )

नितीन : काय झालं यार ? आता तरी सांगशील की नाही. "

श्यामा : हे बघ .. ( तिने गळयाभोवतीचा स्कार्फ सोडला... मुलींच्या तोंडून चित्कार बाहेर पडले.. )

नितीन : ओह माय गॉड!! ( नितीन आश्चर्याने तिच्या गळयाकडे बघू लागला) हे ग काय झालं ?!! इतकं कशाने भाजलं.. एवढं भाजेपर्यंत झोपी गेली होतीस का? गरम तेल उडालं का? डॉक्टरला दाखवलंस का नाही ?"

श्यामा : तेलाने नाही भाजलं... "

नितीन  : मग ? "

(तिने रात्री घडलेला प्रकार सांगितला... )

नेहा : बाप रे !!!.... ए पण तुझा भास पण असू शकतो.

नितीन : हो ... ती चालता फिरता भुतांची स्वप्ने बघते.. वेड लागलंय तिला... येडचॅप

( नितीनने नेहाच्या डोक्यावर टपली मारली . श्यामाचे  डोळे डबडबले .. असहायता तिच्या नजरेत स्पष्ट दिसत होती .. )

नितीन : (मनात )शमू कधीही अशा अवस्थेत दिसली नाही.. कोणी हिच्या वाटेल जाईल असं हिचं व्यक्तिमत्वही नाही.. समजा कोणी गेलाच वाटेल तर त्याची कंबख्ती भरलीच म्हणून समजा .. भुतंखेतं तर दूरच .. साधी देवालाही मनात नाही ही..

( त्याला गतकाळाच्या गोष्टी आठवतात... )....  दोघे गणपतीच्या पाय पडायला जात असतात .. नितीन मनोभावे गणपतीच्या पाय पडतो.. वळून श्यामाकडे बघतो .. ती हसून गणपतीच्या पाया पडते आणि हळूच पूजेच्या ताटात ठेवलेले मोदक उचलते .. रोखून बघत असलेल्या नितीनकडे बघून ती हलकेच डोळा मारते आणि म्हणते, एकदा पाया पडलं तर एक मोदक मिळतो... मी तर या मोदकासाठी हज्जार वेळा पाया पडायला तयार आहे. )

(.. नितीन व्याकुळ होऊन तिच्याकडे बघतो ..  श्यामा  रडवेली होऊन शून्यात नजर लावून बसली  होती... असहाय वाटत होती. नितीनने पुढे होऊन तिचे दोन्ही हात पकडले)

नितीन : शमू, कम ऑन यार... एवढी काय घाबरतेस?!! मी आहे... आम्ही आहोत सर्व तुझ्याबरोबर . ठीक होईल सर्व... भासही असू शकतात हे .. (तिने कातर नजरेने त्याच्याकडे बघितलं... ) ओके ओके... भास नाही म्हणत मी.... पण आपण एखाद्या डॉक्टरला दाखवू आधी ... ते काय म्हणतात ते बघू.. मग ठरवून काय करायचं ते... शिवाय तुझे बाबा त्या मांत्रिकाकडे नेणार आहेतच ना... सो चिल्ड ... हं खाऊन घे आधी आणि मस्त गरमागरम कॉफी पी... ताण हलका होईल तुझा... काय म्हणतोय मी.. ?

श्यामा : (तिने खोलवर सुस्कारा सोडला ) हं ... ठीक आहे.. ( ती शांतपणे खाऊ लागली.)

नितीन : शमू?

श्यामा : हं ?

नितीन : कधीपासून होतंय हे तुला?

श्यामा : गेल्या पाच सहा महिन्यांपासून

नितीन : म्हणजे असे भाजल्यासारखे वाटायचे का नेहमी?

श्यामा : नाही रे.. हे तर काल प्रथमच झाले.. कानाखाली तर सारख्या बसायच्या.. त्याही सणसणीत.. गाल ही सुजायचा एवढ्या जोरात ... भास असेल असे समजून सुरुवातीला मी दुर्लक्ष केले . पण नंतर नंतर जास्तच व्हायला लागलं.. कोणीतरी कडकडून माझ्या हाताला चावा घेतंय असं वाटायचं .. हात जोरात झटकला तरी गच्च काहीतरी चिकटून बसलंय असं वाटायचं .. कोणीतरी उंचावरून मला ढकलून देताय आणि मी खोल खोल कोसळत थंडगार पाण्यात पडतेय असं वाटायचं .. आश्चर्य म्हणजे तो ओला स्पर्शही जाणवायचा... अजूनही ती ओली संवेदना जात

नाही ... अंग बर्फासारखं गार पडतं... पाण्यात गुदमरून मरतेय की काय असं वाटतं रे त्यावेळी... भास तरी कसा म्हणू ह्याला... वेड लागत चाललंय की काय मल असं वाटू लागलंय.

( तिने दोन्ही हातांनी डोके गच्च धरले. ती हमसून हमसून रडू लागली.. तसे सगळे काय करावे ते न समजून फक्त एकमेकांकडे बघू लागले. )

नितीन : शांत हो शमू .. हे बघ मी आहे ना ... तू काळजी करू नकोस.. आपण ह्या गोष्टींचा छडा लावूच. प्लिज तू रडू नकोस अशी...

श्यामा : (तिने स्वतः: ला सावरले ... रुमालाने डोळे पुसत ती क्षीण हसली) मी फ्रेश होऊन येते... बाबा येतीलच इतक्यात न्यायला... आलेच मी पाच मिनिटात ..

नितीन : ओके

(ती निघाली.. वॉशरूम दुसया मजल्यावर होते... स्टूडेंट्सना लिफ्ट चा वापर करण्यास मज्जाव होता.. म्हणून ती पायऱ्या चढूनच दुसऱ्या मजल्यावर आली... कॉलेज सुटलेले असल्याने तिथे जास्त वर्दळ पण नव्हती... वॉशरूम मधून तिच्या टीचर बाहेर पडत होत्या .. ती थोडावेळ थांबली.. त्या जाताच ती आत शिरली.. स्वच्छ होऊन तिने बेसिन मध्ये हात धुतले चेहयावर पाण्याचे हबके मारले ... तेव्हा कुठे जरा बरे वाटले.. बॅगमधून रुमाल काढून तिने तोंड स्वच्छ पुसले.. कंगवा काढून केस नीट विचारले.. डोळयातले काजळ नीट केले.. आत्ता थोडा तजेला आला.. ती हलकेच हसली... तितक्यात बाजूच्या टॉयलेट मधून दरवाजा वाजवण्याचे आवाज येऊ लागले... तिचे काळीज भयाने गोठून गेले... पाय जमिनीलाच चिकटले... तशीच स्तब्ध राहून ती कानोसा घेऊ लागली... आवाज बंद झाला होता.. बाहेर निघण्यासाठी तिने पाऊल उचलले तितक्यात पुन्हा दरवाजाला धडका बसू

लागल्या... वॉशरूम मध्ये तिच्या शिवाय कोणीच नव्हते ... कोणी आत अडकले तर नाही ना?... पण आवाज का देत नाही कोणी?.. ती थरथरत्या पायानी हळूहळू चालत त्या दरवाजापाशी आली... कापत्या हातांनी दरवाजाची मूठ पकडली आणि दरवाजा खोलणार इतक्यात ...... तिची नजर वरती गेली. दरवाजाच्या फटीतून पाण्याचे ओघळ येत होते... तिला आश्चर्य वाटले .. ) . दरवाजाच्या खालून पाणी आले तर समजू शकते .. पण वरतून !! (ती निरखून त्या ओघळांकडे बघू लागली. हळूहळू त्याचा वेग वाढला.. पूर्ण फटीतून पाणी वेगाने बाहेर येऊ लागले.. ती घाबरून पाठी सरकली ... तितक्यात तिची नजर तिथल्या आरशाकडे गेली... आरशातूनही पाणी झिरपत होते..... पायाला काय ओले लागले म्हणून तिने खाली वाकून बघितले... तिच्या पायाचे तळवे बुडतील इतके पाणी खाली जमा झाले होते ... आता मात्र तिची बोबडी वळली... बाहेर जाण्याचा दरवाजा जीव तोडून ती खोलू लागली... पण तो उघडेनाच .. ) खोलत का नाहीय हा दरवाजा .. कोणी कडी लावलीय बाहेरून ?!! (बाथरूमच्या दरवाजावर आता अधिक जोरात धक्के बसत होते.. पायाखालचे पाणी आता गुडघाभर झाले होते.. जणू संपूर्ण बाथरूम एक तळे बनू पाहत होते... तिला स्वप्नातला पाण्याचा स्पर्श आठवला... कासावीस होऊन ती दरवाजाला धडक देऊ लागली... ओरडायला गेली तर तोंडातून आवाज फुटेना... जीभ जणू टाळूला चिकटली होती... वेगाने दरवाजातून वाहणाऱ्या पाण्याकडे बघत ती पूर्ण ताकदीने दरवाजा उघडण्याचा प्रयत्न करू लागली... आणि तितक्यात टॉयलेटचा दरवाजा काड काड आवाज करत मोडला.. पाण्याचा मोठ्ठा लोंढा तिच्या अंगावर आदळला आणि ती कमरेभर पाण्यात गटांगळया खाऊ लागली. )

(नितीनने मनगटावरील घड्याळात बघितले... )

नितीन : इतका उशीर!! ... हिला इतका उशीर का झाला ?!!"

नेहा : हो रे .. बराच वेळ झालाय... गप्पात लक्षातच नाही आले... मी जाऊन बघून येते . (नेहा उठत म्हणाली . )

नितीन : नको तू थांब ... मीच जाऊन बघून येतो.. काहीतरी गडबड दिसतेय... आलोच ( तो पळतच निघाला. दोन दोन तीन तीन स्टेप्स चढत तो दुसऱ्या मजल्यावर आला... वॉशरूम जवळ येताच त्याला दाराखालून पाणी बाहेर येताना दिसले... पटकन पुढे होऊन त्याने दरवाजा खोलायचा प्रयत्न केला, पण तो उघडेनाच ) श्यामा .. श्यामा... आर यू ओके? श्यामा .. ( आतून कोणताच आवाज येईना.. फक्त एका आवाजाशिवाय... असे वाटत होते तुडुंब भरलेल्या नदीचे पाणी आत उसळ्या घेत आहे .. त्याने दरवाजाला जोरजोरात धक्के द्यायला सुरुवात केली. मदतीसाठी त्याने आजूबाजूला पाहिलं.. पण त्या मजल्यावर पूर्ण कॉरिडॉर मध्ये कोणीच नव्हते... त्याला खूप आश्चर्य वाटले ) कमाल आहे ?!!... कॉलेज नुकतेच सुटलेय.. आणि इतकी शांतता.. एकही स्टुडन्ट दिसत नाही?!! (त्याने पुन्हा दरवाजा खोलायचा प्रयत्न केला... अचानक दरवाजाला मधोमध चीर गेली आणि पाण्याच्या प्रचंड वेगाने तो फेकला गेला... दरवाजा मोडून पडला होता आणि पूर्ण कॉरिडॉर मध्ये पाणीच पाणी झाले होते.. तो घाबरून गेला... धडपडून उठत तो पळतच बाथरूम मध्ये घुसला... श्यामा एका कोपऱ्यात बेशुद्ध पडली होती... तिचे पूर्ण कपडे पाण्याने भिजले होते.. अंग एकदम बर्फासारखे थंड पडले होते... त्याने तिच्या नाकाला हात लावून बघितला... श्वास सुरु होता... त्याने तिला उचलले... शक्य तितक्या लवकर ह्या जागेतून बाहेर पडायला हवे हाच विचार त्याच्या डोक्यात होता ... बाहेर आणून त्याने तिला बेंचवर झोपवले.. खिशात हात घालून मोबाईल बाहेर काढला).. ओह !!

नशीब... (त्याने खोलवर सुस्कारा सोडला ... मोबाईल सुरु होता... पाणी पुसून त्याने मित्रांना लवकर वर यायला सांगितले... सगळे धावत पळत वर आले... )

नेहा : काय झाले रे नितीन? असा घाबरलेला का? आणि श्यामा अशी का पडलीय?!!" (नेहा घाबरून बोलली. नितीनने थोडक्यात सर्व प्रकार सांगितला... )

अरे पण तू बोलतोस प्रचंड पाणी होते.. श्यामा त्यात बुडाली... पण हिचे तर केसही ओले नाहीत !!! तुझेही कपडे सुकेच आहेत..

(त्याने चमकून स्वत:चे कपडे चाचपले... तर ते सुकेच होते... घामानेही भिजले नव्हते... श्यामचेही कपडे सुकेच होते... )

नितीन : हा काय विचित्र प्रकार आहे?!! अरे आत्ता मोठा पाण्याचा लोंढा आला आणि दरवाजा तुटला.. ह्या कॉरिडॉर मध्ये पाणीच पाणी झाले होते.. जणू इथे त्सुनामी आली होती ... तो बघ बाथरूमचा दरवाजा तुटला आहे.. ( त्याने वॉशरूमच्या दिशेने बोट दाखवले.. )

नेहा :  तूच बघ...  (ती शांतपणे म्हणाली.  त्याने बघितले... दरवाजा बंदच होता ... पुढे होऊन त्याने दरवाजा उघडला तर तो सहजच उघडला . आत जाऊन त्याने बघितले तर सर्व ठीकठाक होते,, पाण्याचा एकही थेंब नव्हता .

नितीन : आता खरोखर वेड लागेल मला.. ( दोन्ही हातानी त्याने डोके गच्च पकडले.. )  श्यामा आत अडकली होती यार .. पाण्यात बुडाली होती.. मी वेळेवर पोहोचलो नसतो तर....... हिचे  बेशुद्ध पडणेही खोटे आहे का? ( तो चिडून बोलला तसे सगळे गप्प झाले. तो तिला शुद्धीवर आणण्याचा प्रयत्न करू लागला.. पाण्याची बॉटल काढली .. पण घाबरून दूर फेकली.. तिच्या हातांना आपल्या हातांनी घासून गरम करू लागला... बऱ्याच वेळाने ती शुद्धीवर आली... ) आर यु ओके शमू?..

श्यामा : अं.. आय एम ओके.. पण त्या बाथरूम मध्ये... ( तिने घाबरून बाथरूमच्या दिशेने बोट दाखवले.. नंतर स्वतःचे कपडे चाचपले . ) माझे कपडे!!... माझे कपडे सुके कसे?!! मघाशी बाथरूम मध्ये तर मी पूर्ण बुडाले होते .. अक्षरश: गटांगळया खात होते... मग इतकी कोरडी ठणठणीत कशी मी ?!! ( ती आश्चर्याने बोलली.)

नितीन : शमू, काय झालं नेमकं सांगशील ... मी बघितलेला प्रकार भयानक होता ... तुझ्यावर काय ओढवले असेल आत कल्पनाच करू शकत नाही... ( नितीन अजूनही त्या धक्क्यातून सावरला नव्हता . )

श्यामा : आधी इथून जाऊया आपण... खूप भीती वाटतेय मला इथे .. ( तिची नजर अजूनही वॉशरूमवर खिळली होती.

नितीन : हो, चल.. चला रे लवकर इथून.. इथे थांबणं धोक्याचे आहे... चला लवकर ..

( सर्वजण तिथून निघाले . ते जाताच पाण्याचा एक छोटासा ओघळ वॉशरूम मधून बाहेर आला आणि लगेच गायब झाला. )

----------------------

श्यामा आता बरीच सावरली होती.. कॅन्टीन मध्ये बसून सर्व कॉफी पीत होते.. नेहाने दिलेली शॉल तिने अंगाभोवती लपेटून घेतली होती. घडलेला प्रकार तिने सर्वांना सांगितला.

श्यामा : पाणी बाहेर आलं तेव्हा मी गटांगळया खाऊ लागले.. पाणी वेगात चढत होतं.. बाहेर पडायला जागाच नव्हती .. पाणी डोक्याच्या वर जाऊ लागलं तेव्हा मी अक्षरशः: पोहायला सुरुवात केली .. जाऊ कुठे ते कळेनाच .. पाणी पार वरच्या छताला टेकलं तेव्हा मात्र मी बुडाले .. संपूर्णतः: पाण्याच्या विश्वात होते मी.. जीव गुदमरू लागला.. आणि अचानक माझे पाय कोणीतरी गच्च पकडल्याचं मला जाणवलं... त्याही स्थितीत मी खाली बघितलं आणि माझा थरकाप उडाला ..

मित्र : काय दिसलं तुला ? कोण होतं तिथे?!!

( सर्व उत्सुकतेने विचारू लागले. )

( श्यामाच्या चेहर्‍यावरचे भाव भराभर बदलत होते.. प्रचंड भीती तिच्या चेहर्‍यावर दिसत होती... सर्व घटनाक्रम तिच्या डोळयासमोर तरळतो)

श्यामा : माझे पाय दोन लहान मुलांनी पकडले होते.. जेमतेम 7.. 8 वर्षांचे असतील ते.. एक मुलगा आणि एक मुलगी होती.. माझ्याकडे बघून प्रेमळ हसत होते... डोळयात अतोनात प्रेम दिसत होते.. इतके प्रेम तर मला माझ्या भावंडांच्या डोळयातही दिसले नाही यार... इतकी लहान मुले कुठून आली होती?!! आणि त्यांची ताकद !! बाप रे .. प्रचंड ताकदीने ओढत होते ते मला . मी तडफडत होते आणि ते हसत होते... जणू त्यांच्या दृष्टीने तो एक खेळ होता... किंवा मला ते त्यांच्या विश्वात ओढू

पाहत होते... केव्हा मी बेशुद्ध पडले माहित नाही... शुद्धीवर आले तेव्हा तू समोर होतास...

( सगळेजण भीतीने चिडीचूप होते. कॉफी पिण्याचे पण भान त्यांना उरले नव्हते. बराच वेळ कोणी काहीच बोलेना.. )

नेहा : ए  मी घरी जाते.. मला वॉशरूम जायचे आहे... आणि आता इथे जायचे धाडस माझ्यात नाही.. शमू संध्याकाळी मी तुझ्या घरी येते.. तेव्हा बोलू.. बाय .. ( नेहा निघून गेली .. एकेक करत बाकीचे मित्र पण निघून गेले .. केवळ नितीन आणि श्यामाच तिथे राहिले. नितीनने तिच्या हातावर हात ठेऊन थोपटले ..

नितीन : डोन्ट वरी शमू.. सर्व ठीक होईल... पण एक लक्षात ठेव, कधीही एकटी कुठे जाऊ नकोस ..

श्यामा :  नितीन तुला खोटे वाटते का रे हे सर्व?...

नितीन :  नाही... मी बघितले नसते तरी खोटे वाटले नसते.. माझा विश्वास आहे तुझ्यावर.. पण जे मी बघितलं ते कधीच विसरू शकणार नाही.. आणि तू जे सांगितलं ते तर त्याहून भयानक आहे .. हे बघ तुझे बाबा येतील इतक्यात.. त्यांना सांगू आपण .. काहीतरी मार्ग निश्चित निघेल... त्याची नजर त्यांना शोधत असलेल्या तिच्या बाबांकडे गेली..

नितीन : हॅलो अंकल, आम्ही इकडे आहोत.. कॅन्टीन मध्ये .. इकडे ... ( त्याने उभे राहून हात उंचावला.. ते कँटीन मध्ये आले... श्यामाकडे बघून त्यांना काहीतरी विपरीत घडल्याची कल्पना आली.. श्यामाने घडलेला सर्व प्रकार त्यांना सांगितला. )

बाबा : तू काहीतरी खाऊन घे .. आपण आत्ताच माझ्या त्या मित्राकडे जाऊ.. वेळ घालवण्यात काही अर्थ नाही .

श्यामा : मला काही नको बाबा .. अजिबात इच्छा नाही... खूप थकवा आला आहे मला... स्कुटीवर बसू शकेल का नाही शंकाच आहे

बाबा : तुम्ही दोघे रिक्षाने या... मी पुढेच राहतो गाडीवर... चालेल ?

नितीन : चालेल अंकल ... मी राहतो सोबत श्यामाच्या ... काळजी नका करू..

बाबा : चला लवकर ...

( ते निघाले तेव्हा टेबलावरचा ग्लास धक्याने खाली पडला आणि सगळे पाणी जमिनीवर सांडले .. श्यामा घाबरून त्या पाण्याकडे बघू लागली... तसे नितीनने तिला खेचतच तिथून बाहेर काढले ... जमिनीवर सांडलेले पाणी क्षणात सुकून गेले )

---------------------------------------------------------------------

बाबा : श्यामा हे माझे मित्र अवधूत साने .. अवधूत ही माझी मुलगी शाल्मली .. आणि हा मुलगा तिच्याच क्लास मध्ये आहे.. नितीन ..

( श्यामाने हात जोडून नमस्कार केला

श्यामा : नमस्कार काका ..

अवधूत गुरुजी : नमस्कार बेटा... बसा तुम्ही .. मी आलोच

( त्यांना बसायला सांगून अवधूत गुरुजी आतल्या खोलीत गेले. श्यामा आजूबाजूला निरखून बघू लागली. बाहेरच्या ज्या हॉल मध्ये ते बसले होते तो हॉल देवांच्या फोटोने भरून गेला होता.. जास्त सामानही तिथे नव्हते.. नाही म्हणायला एक सोफा आणि काही खुर्च्या होत्या. धुपाचा दर्प दरवळत होता ... त्यावरून एखाद्या पुजाऱ्याचे घर निश्चित वाटत होते .. एका सामान्य पुजाऱ्याचे घर.. हे काय त्या शक्तीशी सामना करणार ?!! ... तिने प्रश्नार्थक नजरेने वडिलांकडे बघितलं... त्यांनी तिच्या नजरेतले भाव ओळखून शांत राहण्याची खूण केली . नितीनने तिथलाच एक रंगीबेरंगी दगड उचलला.. आणि निरखून बघू लागला . )

गुरुजी : ती वस्तू खाली ठेव मुला.. इथल्या कोणत्याही वस्तूला हात लावू नकोस ( गुरुजी बाहेर येत म्हणाले... त्यांच्या चेहऱ्यावर राग नव्हता तर काळजी होती. नितीनने पटकन हातातला दगड खाली ठेवला . )

नितीन : सॉरी काका ..

गुरुजी : तुम्हाला कुतूहल वाटेल अश्या बऱ्याच वस्तू इथे दिसतील.. सगळ्याच नुकसान करणाऱ्या आहेत असंही नाही .. पण त्यांचा वापर विधिवत केला जातो.. केवळ कुतूहल म्हणून स्पर्श करायला जावं आणि काही अघटित व्हावं,, त्यापेक्षा त्यांना हात न लावलेला बरा... माझ्या बरोबर आतल्या पूजेच्या खोलीत चला.. आणि मी सांगेन त्याप्रमाणेच करा.. उगाच स्वतःचे डोके चालवू नका.. तुमच्या भल्यासाठीच सांगतोय (दटावणीच्या सुरात ते बोलले.. सर्वांनी शांतपणे माना डोलावल्या. तिघेही त्यांच्या पाठोपाठ गेले... बाहेरच्या खोलीपेक्षा इथले वातावरण खूप वेगळे होते.. इथेही देवांचे फोटो होते .. आख्खी खोली देवांच्या फोटोंनी भरली होती.. खाली जमिनीवरच बैठक मंडळी होती.. स्वच्छ पांढरी चादर त्यावर अंथरली होती .. त्यावर एक बैठा टेबल ठेवला होता.. पूजेचे साहित्य त्यावर मांडले होते. एक तांब्या ठेवला होता .. त्यावर विड्याचे पान होते ... लिंबांना अगरबत्त्या टोचल्या होत्या.. एका ताटात पाणी ठेवले होते.. तऱ्हेतऱ्हेचे रंग, गुलाल वगैरे ठेवले होते... भीती वाटत नव्हती .. पण अनामिक दडपण मात्र सर्वांवर आले होते..)

गुरुजी : बसा खाली ... ( सर्वजण त्यांच्या समोर मांडी घालून बसले. ) हं .. आता मला सांगा पुन्हा एकदा, नक्की कुठून सुरुवात झाली ते ... मुली तू सांग सगळे सविस्तर ..

( श्यामाने त्यांना सुरुवातीपासून सगळे सांगितले. त्यांच्या चेहऱ्यावरचे भाव बदलत होते ... ते खूपच गंभीर झाले. बराच वेळ टेबलावरच्या कागदांमध्ये डोके खुपसून काहीतरी बघत राहिले.)

गुरुजी : हिचा जन्म कुठे झाला ?

बाबा : मालाडला ... एका चाळीत राहत होतो आम्ही त्यावेळी.. का पण ?" वडिलांनी न कळून विचारले.

गुरुजी : हिचा जन्म झाला त्यावेळी .. म्हणजे जन्माच्या आधी कोणाचा मृत्यू झाला होता का? अनैसर्गिकपणे ? "

बाबा : नक्की आठवत नाही ...

गुरुजी : आठवून बघा... ते माहित होणे खूप महत्वाचे आहे"

बाबा : ( विचारमग्न झाले.. ) अं... तिच्या जन्माच्या वेळेस नाही .. पण त्याच्या खूप आधी.. म्हणजे साधारण ती पोटात आली त्याच्या महिनाभर आधी आमच्याच चाळीतील एका कुटुंबाने आत्महत्या केली होती. पूर्ण कुटुंबाने नाही .. फक्त त्या परिवारातील स्त्रीने तिच्या मुलांसोबत जीव दिला होता. "

गुरुजी : कुठे दिला होता जीव?"

बाबा : विहिरीत .. ( श्यामाने चमकून वडिलांकडे बघितलं )

गुरुजी : वेळ काय होती ?

बाबा : पहाटे पहाटेची.. साधारण चार वाजता .. सकाळी उठेपर्यंत प्रेतं फुगून वर आली होती ..

गुरुजी : विहीर किती दूर होती तुमच्या घरापासून ?"

बाबा : पाठीमागेच .. आमच्या खोलीच्या खिडकीतून दिसायची.. गर्द आमराई होती आमच्या चाळीमागे .. तिथेच ही विहीर होती.. खूप खोल होती.. कायम भरलेली असायची... बिचारी असे काही करेल असं कधीच वाटलं नाही ... काहीच बोलायची नाही.. बोलले तरी कळले नसते आम्हाला.. इतकी काळी होती ती की कोळसाही बरा म्हणायचा.. पण मुले मात्र खूप गोड .. मोठी मुलगी तर परीसारखी दिसायची.. असेल साधारण दहा वर्षांची.. बाकी दोन मुले असतील सात आठ वर्षांची.. एक मुलगा आणि एक मुलगी.. तीही देखणी होती.. आईबाप दोघेही काळे आणि मुले

गोरीपान .. आम्ही ब्लॅक अँड व्हाईट म्हणून चिडवायचो.. मुले पळवून तर आणली नाहीत असे बोलायचो.. "

गुरुजी : मग जीव का दिला तिने?"

बाबा : त्या बाईचा नवरा तिला खूप मारायचा.. ह्याच कारणामुळे.. मुले इतकी देखणी का म्हणून ... तो काळा... एकही मूल त्या दोघांसारखे नाही .. त्याला संशय यायचा .. मुले माझी नाहीत म्हणायचा.. खूप मारायचा मुलांना आणि बायकोला .. एकदा तर त्याने मोठ्या मुलीला विष पाजून मारायचा प्रयत्न केला होता .. (श्यामाने घाबरून गालावरून हात फिरवला... संकेत मिळत होते.. ती गळयाची आग आग .. )... उपाशी ठेवायचा ... आम्ही चाळीतले सर्वजण गुपचूप त्यांना खायला द्यायचो... शेवटीशेवटी संशय आला म्हणून तो घरीच बसायचा ... आम्हाला काहीच करता आलं नाही आठवडाभर उपाशी होती पोरं .. नंतर त्यांची फुगलेली प्रेतच बघितली . (वडील उदास होत म्हणाले. श्यामाने पोटावर हात ठेवला.. भूक.. प्रचंड भूक... )

गुरुजी : ती जागा कधी सोडलीत तुम्ही?

बाबा : श्यामाचा जन्म झाला आणि लगेचच .. मला बढती मिळाली आणि मग मी हे आत्ताचं घर घेतलं.. पण हे का विचारताहेत तुम्ही ?!

गुरुजी : सांगतो... आधी मला खात्री करून घेऊ द्यात .. मुलीची कुंडली आणलीत तुम्ही ?

बाबा : हो.. आणली आहे" त्यांनी शबनममधून फाईल काढून त्यांना दिली . बराच वेळ गुरुजी तिची कुंडली बघत होते.

गुरुजी : मुली तू कधी तुझ्या जन्मस्थळी गेली होतीस ?"

श्यामा : नाही काका .. कधीच नाही...

गुरुजी : कधी पिकनिक ?

श्यामा : अं .. नाही.. निदान मला तरी तसे आठवत नाही ..

नितीन : अगं श्यामा , आपण सौरभचा वाढदिवसाला नव्हतो का ग गेलो ... बाईकवरून " त्याने चमकून जीभ चावली. आणि तिच्या वडिलांकडे हळूच बघितलं .. श्यामाही कावरीबावरी झाली.. तिने रागाने नितीनकडे बघितलं.. त्याने खांदे उडवून दिलगिरी व्यक्त केली.. पण तिच्या वडिलांच्या चेहऱ्यावर राग नव्हता .. उलट काळजी होती. )

बाबा : कुठे गेला होतात तुम्ही ? म्हणजे कोणत्या ठिकाणी गेला होतात ?

नितीन : बद्रुद्दीन चाळीत ..

बाबा : अरे बाप रे.. बद्रुद्दीन चाळीत कोणाकडे ? किती नंबर खोलीत?

नितीन : शेवटून दुसरी खोली .. नंबर माहित नाही.. सुरुवातीच्या खोलीला जाळीचा दरवाजा आहे . त्याच लाइनीतल्या शेवटून दुसऱ्या खोलीत गेलो होतो.. आमचा मित्र सौरभ तिथेच राहतो ना ..

बाबा : शेवटच्या खोलीत तुम्ही गेला तर नव्हता ना ? (त्यांनी घाबरून विचारले . )

नितीन : नाही .. फक्त श्यामाने कडी उघडून आत पहिले होते.. तिला माहित नाही काय झाले होते .. म्हणाली एकदा उघडून बघायची इच्छा होतेय "

बाबा : अरे देवा!! ( तिच्या वडिलांनी कपाळाला हात मारून घेतला . )

श्यामा : काय झालं बाबा ?!! तुम्ही असे घाबरलात का?

बाबा : तुम्हाला नेमकं तिथेच जायचं होतं का?!! ती जागा आणि खोलीही तीच आहे जिथे ते कुटुंब राहायचं.. आणि ती जाळीचा दरवाजा असलेली खोली आपली होती.. ( श्यामा सुन्न झाली . गुरुजींनी तांब्यावरचे पान काढले आणि त्यात बुडवले .. )

गुरुजी : मुली हे पाणी हातात घे आणि मी सांगेन तेव्हा ह्या ताटातील पाण्यात सोड ... कोणत्याही परिस्थितीत कोणीही जागचे हलायचे नाही... काहीही होवो ....

( तिने होकारार्थी मान हलवली. तिच्या दोन्ही हातांच्या ओंजळीत त्यांनी पानाने पाणी सोडले . ते डोळे मिटून मंत्र पुटपुटू लागले.. त्यांच्या मंत्रांचा स्वर त्या शांत वातावरणात घुमू लागला... हळूहळू त्या मंत्रांची लय वाढली.. त्याचे प्रतिध्वनी येऊ लागले .. इतका वेळ शांत असलेल्या वातावरणात अचानक खळबळ उडाली... जी सर्वांनाच जाणवू लागली... बाहेरच्या खोलीत कोणीतरी जोरजोरात श्वास घेत असल्याचे ऐकू येऊ लागले... श्यामाला तोच ओलसर .. पाणवट स्पर्श जाणवू लागला... थंडीने तिचे शरीर कापू लागले... तिच्या वडिलांनी तिच्या पाठीवर हात ठेवला .. बर्फासारखे तिचे अंग गार पडले होते.. घाबरून तिने त्यांच्याकडे बघितले.. त्यांनी डोळयांनीच धीर दिला.. मंत्र संपले तसे गुरुजींनी डोळे उघडले .. तिला नजरेनेच खूण केली... तिने हळूच ओंजळीतले पाणी ताटात सोडले. असंख्य माशा घोंगाव्यात तसा आवाज येऊ लागला आणि अचानक सर्व शांत झाले... काही क्षण तसेच शांततेत गेले आणि श्यामाच्या तोंडून किंकाळी बाहेर पडली ... डोळे फाडफाडून ती ताटातल्या पाण्याकडे बघत होती... दोघांनीही ताटाकडे बघितलं.. ताटातले पाणी लालबुंद झाले होते.. रक्तासारखे ... त्यांनी घाबरून गुरुजींकडे बघितलं .. ते अजूनही डोळे मिटून होते.. थोड्यावेळाने त्यांनी डोळे उघडले आणि ताटाकडे बघितलं .. रक्तासारखे पाणी बघून ते गंभीर झाले... डोळे मिटून मंत्र म्हणत त्यांनी पानाने त्या ताटात पाणी शिंपडले ... तसे ते पाणी पूर्ववत झाले...

आता वातावरण पूर्वीसारखेच वाटू लागले.. श्यामाचे शरीरही नॉर्मल झाले .. तो पाण्याचा स्पर्शही नाहीसा झाला...

बाबा : काय झालं? माझ्या मुलीच्या जीवाला धोका तर नाही ना अवधूत?" वडिलांनी चिंतेने विचारलं .

गुरुजी : आहे.. धोका आहे.. प्रचंड धोका आहे... श्यामाचा त्या घराशी काय संबंध आहे हे नेमके सांगता येणार नाही .. पण माझा अंदाज आहे की ही अशावेळी तिथे गेली ज्यावेळी ते अतृप्त आत्मे तिथे होते किंवा .. "(बोलता बोलता ते थांबले. )

नितीन : किंवा काय गुरुजी? ( नितीनने उत्सुकतेने विचारलं ).

गुरुजी : किंवा श्यामा पूर्वजन्मी त्या तीन मुलांपैकीच एक असावी.. हिचा पुनर्जन्म झाला आणि बाकीची त्याच भूतयोनीत अडकून पडली असावीत... हिला बघितलं आणि पुन्हा तिला त्यांच्या बरोबर घेऊन जायला ती आली असावीत...

( श्यामा पांढरीफटक पडली)

श्यामा : म्हणजे ते मला मारायला आलेत?!!

गुरुजी : नक्की नाही सांगता येणार.. पण त्या जागेवर आपल्याला पुन्हा जावे लागेल... ह्यावेळी मी सोबत येईल तुमच्या ..

श्यामा : नको बाबा, तिकडे नको.. मला खूप भीती वाटत आहे.. प्लिज नको.. ( ती काकुळतीला येत बोलली. )

बाबा : आपल्याला जावंच लागेल बाळा .. नाहीतर त्या शक्ती तुझा पाठलाग सोडणार नाहीत .. तुला त्रास देणं सुरूच राहील त्यांचे .. आणि काय भरवसा त्या शक्ती तुला सहजासहजी सोडून देतील.. गुरुजी बोलतात तसे त्यांनी तुला त्यांच्यासोबत नेले

तर... नाही नाही.. आपण आत्ताच जाऊ ... आम्ही आहोत तुझ्यासोबत.. घाबरू नकोस.. गुरुजी आहेत.. तुला काहीही होणार नाही.

श्यामा : पण बाबा ... तिथे जाऊन करणार काय.. त्या जागेवर त्या जास्त आक्रमक असतील.. ते त्यांचे घरच आहे ना... इथे बघितलं ना काय झालं ते... तिथे काय होईल याची कल्पनाच करवत नाही... " ती घाबरून बोलली.

गुरुजी : तुला काहीही होणार नाही.. हा अभिमंत्रित केलेला धागा गळयात घाल.. कधीही काढू नकोस.. म्हणजे तुला त्या शक्ती स्पर्शही करू शकणार नाहीत. शिवाय मी असेलच सोबत सतत .. पण आजच आपल्याला गेलं पाहिजे.. कारण मला जाणवतंय .. त्या आता जास्त वाट बघणार नाहीत. ( गुरुजी गंभीर होत म्हणाले. त्यांनी उद्पात्रातील राख चिमटीत घेऊन तिघांच्या कपाळाला लावली. )

गुरुजी : चला निघू आपण ..

बाबा : पण मी तर स्कुटी आणलीय .. ट्रेनने जावे लागेल आपल्याला.

गुरुजी : माझी कार आहे ... लवकर पोहोचता येईल... चला ..

********************************************

( कारने मालाड मध्ये प्रवेश केला आणि श्यामचे हृदय धडधडू लागले .. चेहऱ्यावरची भीती लपवत ती बाहेर बघू लागली... खूप ट्रॅफिक होती.. तरी तिची भीती कमी होईना.. जणू ती .. आणि केवळ तिच एका मोठ्या निर्मनुष्य बेटावर अडकून पडल्यासारखे वाटत होते.. चोहोबाजूने पाणीच पाणी,, आणि जिवाच्या आकांताने ती हातपाय मारत आहे.. मेन रोड सोडून गाडी आता छोट्या गल्ल्यांतून जाऊ लागली.. अचानक पुन्हा तोच पाणवट स्पर्श ... तिने चमकून आजूबाजूला बघितले... चाळींशिवाय तिला काहीच दिसले नाही.. )

श्यामा : (मनात ) आमराई सोडाच .. एकही झाड इथे दिसत नाही ... तसा गुलमोहोर दिसतोय .. पण विहीरही दिसत नाहीय .... मग ही जाणीव?!!..

(एका गल्लीच्या तोंडावर गाडी थांबवावी लागली.. दोन चाळींच्या मधून जाणारी वाट फारच निमुळती होती ... जेमतेम दोन ते तीन व्यक्ती एकसाथ जाऊ शकत होत्या.. एका घरातील बाई जिन्यावर बसली तरी समोरच्या घराच्या जिन्यावर बसलेल्या बाईशी हात मिळवू शकत होती. )

आपण इथे राहायचो?!! ... पण मोकळेपणा होता इथे.. जो बंदिस्त फ्लॅटमध्ये आढळत नसे ... वडिलांचे डोळे जुन्या आठवणींने चमकले.. त्यांच्या चेहऱ्यावर प्रसन्न हसू उमटले.. आपण कशासाठी आलो आहोत हेच ते क्षणभर विसरले.. )

श्यामा : बाबा .. (श्यामाने त्यांना टोकले .. तसे ते भानावर आले. )

बाबा : श्यामा, आपण इथे राहायचो पूर्वी.. तुझा जन्म इथेच झाला.. ज्यांना आपण हे घर विकले तीच लोकं जर इथे अजूनही राहत असतील तर आपल्याला काही अडचण येणार नाही माहिती मिळायला .. " त्यांनी डोअर बेल वाजवली.

एक वृद्ध स्त्री आतून आली,

स्त्री : कोण पाहिजे आपल्याला ?

(बाबांनी थोडावेळ निरखून तिला बघितलं आणि ते प्रसन्न हसले )

बाबा : बहुतेक तुम्ही मला ओळखले नाहीत ... मी पण काय वेडा आहे.. कसे ओळखणार !.. अठरा वर्षे लोटली इथून निघालो त्याला .. मी शेखर .. शेखर सावंत ... पूर्वी मी ह्याच घरात राहायचो.. आता ओळखलंत का ?

स्त्री : ओह !! तुम्ही ... या .. या ना आत ... प्लिज ... इतक्या वर्षांनंतर कसे ओळखणार .. चेहरेही बदलले आपले... ( त्या हसत म्हणाल्या . )

बाबा : तेही बरोबरच आहे ( तेही हसले. सर्वजण घरात शिरले.. बाबांनी खोलीभर नजर फिरवली.. )

बाबा : अजूनही तशीच ठेवली आहे खोली तुम्ही... घर सोडलेच नाही असे वाटते"

जोशी ताई : (त्या हसल्या ) एवढ्या छोट्या घराला काय सजवणार.. बस टापटीप ठेवले की पुरे होते.. काय घेणार तुम्ही? पोहे करते ... चालेल ना?

बाबा : नाही .. खरेच काही नको... बस एक कप चहा मिळेल तर ... "

श्यामा : बाबा तुम्ही पण... "

बाबा : अरे आमची जुनी ओळख आहे.. लागेबांधे असतात हे ... घर विकले म्हणून काय झाले.. त्या घरात राहणाऱ्या माणसांशी भावनिक नाते जुडत असते .. बरोबर ना ताई ?

जोशी ताई : अगदी बरोबर... ही मुलगी ना तुमची?

बाबा : हो, ... शाल्मली ... आणि शमू ह्या जोशी ताई बरं का .

श्यामा : नमस्ते काकी

जोशी ताई : नमस्ते बाळा ... कितवीला आहेस तू आता ?

श्यामा : बारावीला

जोशी ताई : बसा हं ... आलेच मी

(त्या आतील खोलीत गेल्या. थोड्याच वेळात त्या चहा घेऊन आल्या .. )

जोशी ताई : इकडे कसे येणे केलेत आज ?

बाबा : थोडे काम होते ह्या बाजूला ... म्हंटलं मुलीला तिचे जन्मस्थळ दाखवावे ... ह्याच घरात रांगली ती ... ( बाबा खूपच भावुक झाले होते... )

श्यामा : बाबा मी घर बघू ...

जोशी ताई : अगं एवढंच घर आहे आपलं.. आतल्या बाजूला छोटेसेच किचन आहे ... पण तुझी इच्छाच आहे तर घे बघून... मुलांना खूप उत्सुकता असते हो... जा आतल्या बाजूला ...

( श्यामा उठून आत गेली .. जेमतेम दोन व्यक्ती उभ्या राहू शकतील एवढेच छोटे किचन होते ते.. ओटा होता म्हणून किचन म्हणायचे. बाजूलाच छोटीशीच मोरी ... एक लहानशीच खिडकी... न राहवून ती खिडकीजवळ गेली... बाबांचे शब्द कानात गुंजत होते,, आपल्या खोलीतून ती विहीर दिसते... खरेच दुसऱ्या टोकाला एक विहीर दिसत होती... पण आजूबाजूला एकही झाड नव्हते ... फक्त दुसऱ्या इमारतीच्या कंपाऊंडची भिंत मात्र त्या विहिरीला लागून उभी होती... बाजूलाच

एक पाणीपुरीचा ठेला होता.... ती भारल्यासारखी त्या विहिरीला बघू लागली ... खांद्यावर कोणाचा तरी हात पडला तशी ती दचकली ... बाबा तिच्याकडे बघत होते.. त्यांनीही विहिरीकडे बघितलं... )

बाबा : ये बाहेर चल.. चहा घे (दोघेही बाहेर आले... ) ताई, ते शेवटचे घर विकले गेले का? का अजूनही तो माणूस राहतो तिथे?

जोशी ताई : नाही ते कोणीही विकत घेत नाही.. तो माणूस तुम्ही गेल्यावर पाच सहा महिने होता.. नंतर एके दिवशी गायबच झाला.. कोणालाच त्याचा पत्ता लागला नाही.. त्याचे कोणी नातेवाईकही नव्हते ... दोन वर्षे वाट बघितली .. सेक्रेटरीने मिटिंग घेतली .. रूम कोणाला तरी भाड्याने देण्याचा निर्णय घेतला.. तो माणूस येईपर्यंत.. आला असता तर ते सर्व भाडे त्यालाच देण्याचे ठरले होते.. त्याप्रमाणे एक जोडपे आले देखील.. पण एकच रात्र थांबले आणि दुसऱ्याच दिवशी सामान बांधून निघून गेले.. विचारले तर काहीच बोलले नाहीत.. प्रचंड घाबरलेले होते... त्यानंतरही तीन वेळा असाच प्रकार घडला ... शेवटी आम्ही नाद सोडून दिला ... कोणीच जात नाही तिथे.. इतकी वर्षे लोटली तरी त्या खोलीची दहशत वाटते.. दुसरीकडे परवडत नाही .. घरांच्या किमती तरी किती वाढल्या आहेत.. नाईलाजाने राहतो इथे... शिवाय तसा काही त्रास नाही कोणालाच .. फक्त त्या घरात जात नाही बस ..

बाबा : आम्हाला बघता येईल किती खोली ?( बाबांनी हळूच विचारले.. )

जोशी ताई : उघडीच असते ती खोली.. बस बाहेरून कडी लावली आहे ... पण तुम्हाला का बघायची आहे?!! तिथे जाणं धोक्याचे आहे.. बाजूच्या खोलीत राहणारे लोक बोलतात रात्रीचा लहान मुलांच्या रडण्याचा आवाज येतो .. कधी कधी तर पाणी सुरु असल्याचे पण आवाज येतात ... आम्हीही बरेच वेळा तो आवाज ऐकलं आहे..

आता तर सवयच पडली आहे.. काहीच वाटत नाही... पण तुम्ही ती खोली उघडू नये ...

बाबा : आम्हाला बस एकदाच बघायचे आहे.. का ते नंतर सांगतो... बस एकदाच ... कोणाचे काही ऑब्जेक्शन असेल तर विचारा..

जोशी ताई : ह्यावेळी तर कोणीच घरात नसतात .. बायका असतात .. पण दुपारची वामकुक्षी ( त्या हसल्या. ) संध्याकाळी कामावरून परततील सर्व .. तुम्ही बघून घ्या.. पण आत जाऊ नका...

बाबा : हो ..

( सगळेजण त्या शेवटच्या खोलीसमोर आले... दरवाजाला बाहेरून फक्त कडी लावली होती... कुलूप नव्हते... गुरुजींनी डोळे मिटले... आपल्या हातातील जपमाळ श्यामाच्या गळयात घातली . )

गुरुजी : दरवाजाची कडी काढ बाळा ... घाबरू नकोस .. तुला काहीही होणार नाही.. ही जपमाळ तुझे रक्षण करेल..

(श्यामाने थरथरत्या हातांनी कडी काढली .. काही क्षण सगळयांकडे बघत हळूच दरवाजा उघडला ... श्वास रोखून सगळे बघत होते .. पण त्यांना अपेक्षित असे काहीच घडले नाही .. गुरुजींनी तिला आत जाण्याची खूण केली... भीतीने तिने मान हलवली.. ) तू आधी पुढे हो.. मागून आम्ही येतंच आहोत.. जे आहे हे तुला आलेली बघून नक्कीच काहीतरी रिऍक्ट होईल .. आणि त्याचा मग बंदोबस्त करता येईल.. हो पुढे तू .. काहीही होणार नाही.

( तिने घाबरतच आत पाऊल टाकले... काहीही झाले नाही बघून तिची भीती थोडी दूर झाली ... दरवाजा पूर्णपणे उघडून तिने आत प्रवेश केला... खोलीत जळमटे लटकलेली होती.. उग्र दर्प पसरला होता तिने नाकाला रुमाल लावला आणि बाहेर पडायला मागे वळली .. इतक्यात दरवाजा खाडकन बंद झाला . )

( दरवाजा आतून बंद होताच बाहेर एकच गोंधळ उडाला. नितीन दरवाजाला जोरात धक्के देऊ लागला. श्यामाच्या बाबांनी शेजारच्या घरातून मोठी पहार आणली . )

बाबा : पोरा तू बाजूला हो.. दरवाजा तोडावा लागेल. ( नितीन बाजूला होताच त्यांनी दरवाजावर घाव घालायला सुरुवात केली... एव्हाना आजूबाजूच्या घरातील बायका बाहेर आल्या होत्या .. पण त्या पुढे आल्या नाहीत. घाबरून दरवाजातच उभ्या राहिल्या. गुरुजींनी हाताच्या इशाऱ्याने त्यांना थांबण्यास सांगितले ... )

गुरुजी : काही उपयोग होणार नाही ... पण काळजी करू नका, मुलीला काहीही अपाय होणार नाही .... अभिमंत्रित केलेली माळ जोपर्यंत तिच्या गळयात आहे तोपर्यंत ती सुरक्षित आहे... त्या शक्ती तिच्याशी बोलण्याचा प्रयत्न करतील.. त्यानंतर हा दरवाजा आपोआप उघडेल ... आपल्याला कळेल नक्की काय झालंय ते ... आज रात्रीच आपल्याला विहिरीजवळ यज्ञ करावा लागेल... आता काही वेळ कोणीही माझ्याशी बोलण्याचा प्रयत्न करू नका...

(त्यांनी तिथेच आसन अंथरून बैठक मारली आणि डोळे मिटून घेतले. )

(बंद झालेल्या दरवाजाकडे बघून श्यामाचे अवसानच गळाले ... भीतीने तिच्या तोंडून शब्दच फुटेना ... अचानक तिला वाटले आपल्या पाठी कोणीतरी आहे...

तिच्या हातापायांना कंप सुटला ... पाठी वळून बघण्याचे धाडस होईना ... पाठीमागून लहान मुलांच्या खळखळून हसण्याचा आवाज आला आणि तिने झटक्यात मागे वळून बघितले... एक लहान मुलगा आणि मुलगी तिच्याकडे बघून गोड हसत होती... ह्यांना कुठेतरी बघितले आहे आपण.. पण कुठे .. तिला आठवेना.... येस्स.. कॉलेजची वॉशरूम ... आपला पाय खेचणारे हीच दोघे होते.. म्हणजे ही भुतं आहेत.. बापरे .... ती घाबरून दरवाजाला चिकटून उभी राहिली... ती दोघेही तिच्या जवळ येऊ लागली.. तशी ती जिवाच्या आकांताने ओरडली )

श्यामा : थांबा,, प्लिज थांबा .. जवळ येऊ नका माझ्या .. कोण आहात तुम्ही ? का छळताहेत मला?

लहान मुलगा : ताई .. ( त्या लहान मुलाने गोड आवाजात तिला हाक मारली.. )

श्यामा : ताई?!!

लहान मुलगा : हो ताई.. तू ताई आहेस आमची ... विसरलीस... ?

श्यामा : तुम्ही माझी भावंडे नाहीत.. माझी भावंडे घरी आहेत... कोण आहात तुम्ही?

लहान मुलगा : तू विसरलीस .. पण आम्ही अजूनही तुझी वाट बघत आहोत... तुझ्याशिवाय आम्हाला खूप एकटे वाटत आहे.. तुझ्याशिवाय मजाच येत नाही खेळायला ...

श्यामा : तुम्ही काय बोलताहेत मला काहीच समजत नाही.. प्लिज मला माझ्या वडिलांकडे जाऊ द्या... उघडा हा दरवाजा .. प्लिज .. ( तिने हात जोडून विनवणी केली . )

( ती दोघे हसू लागली.. हळूहळू चालत तिच्या जवळ येऊन उभी राहिली . )

ती मुलगी : ताई तू थांबली का नाहीस आमच्या जवळ? (मुलगी निरागस चेहऱ्याने बोलली. )

श्यामा : क.. क.. कुठे?

ती मुलगी : विहिरीत... ( श्यामाने भीतीने आवंढा गिळला .. ती दरवाजा उघडण्याचा प्रयत्न करू लागली.. पण तो गच्च झाला होता .. )

ती मुलगी : खूप मजा येत होती तिथे.. कसलाही त्रास नव्हता.. आपल्या वडिलांच्या माराचाही... बरं झालं आपल्या आईने आपल्याला विहिरीत ढकलून दिलं ते .. त्रास व्हायचा ना गं खूप.. तुला तर किती मारलंय त्यांनी . हातोड्यासारखा हात कानाखाली पडला की आठवडाभर वळ जायचे नाहीत तुझ्या गालावरचे.. ( श्यामाचा हात नकळतपणे गालावर गेला.. त्या थपडा तिला आठवल्या... ती थोडी सावरली... निरखून त्या दोघांकडे बघू लागली . )

श्यामा : तुमची नावं काय आहेत?

बंटी : मी बंटी आणि ही कोमल .. तू आमची श्यामा ताई ..

श्यामा : श्यामा?!!"

बंटी : हो तुझे नाव श्यामाच होते .. शाल्मली ... का गेलीस गं तू लवकर ..

(तिच्याकडे या प्रश्नाचे उत्तर नव्हते .. काय बोलणार होती ती?!!)

श्यामा : मी कसे सांगू आता ते.. मला तर काहीच आठवत नाही.. का ढकलले आई ने आपल्याला?

कोमल : आपले पपा खूप मारायचे आपल्याला ... उपाशी ठेवायचे.. आई कंटाळून गेली माराने आणि त्या दिवशी पहाटे तिने आपल्याला झोपेतून उठवले.. गम्मत दाखवते म्हणाली... आधी आपल्या तिघांना तिने विहिरीच्या कठड्यावर बसवले ... खूप खोल खोल होती विहीर ... काहीच दिसत नव्हते .. थंडीही खूप वाजत होती...

आणि अचानक आईने आपल्या तिघांनाही एकामागोमाग एक ढकलले .. नंतर तिनेही उडी घेतली.. खोल खोल पडलो आपण पाण्यात .. बुडलो... नाका तोंडात पाणी गेले... शुद्धीवर आलो तेव्हा विहिरीच्या कठड्यावर बसलेलो होतो... पण भुतं होऊन

( कोमल हसून म्हणाली.. ) आई पण आपल्याबरोबर आली नंतर ... पण तू लगेचच निघून गेलीस... त्या कोपऱ्याच्या काकूंच्या पोटात ... तुला आम्ही परत आणणार होतो.. पण ती लोक घरच सोडून गेली.. त्या दिवशी तुला बघितलं सौरभच्या घरात .. आणि आनंदाने आम्ही खूप उड्या मारल्या विहिरीत... तुझा पत्ता आम्हाला सापडला होता ना .. आईने तुला बरोबर शोधून काढले.. खूप हुशार आहे ती... "

श्यामा : कुठे आहे ती .. दिसत नाही... ( तिने आजूबाजूला बघितले.. त्या दोघांशिवाय तिला कोणीच दिसले नाही. )

कोमल : तिला कोणीतरी प्लँचेट मध्ये बोलावले आहे.. येईल थोड्यावेळाने...

बंटी : तू आता आमच्याबरोबरच राहा.. आम्हाला करमत नाही तुझ्याशिवाय.. आईला तर अजिबात नाही.. तिचा खूप जीव होता तुझ्यावर ... एका क्षणासाठी पण तू दूर झालेली तिला चालायचं नाही.. राहशील ना ? ( बंटी केविलवाण्या आवाजात बोलला . )

श्यामा : हे बघा मी तुमची ताई नाही.. असेल.. पण मागील जन्मी.. आता मला माझे बाबा आहेत, आई आहे.. दोन भावंडे आहेत.. मित्र आहेत... मी खूप खुश आहे ह्या जन्मात... मला माझ्या परिवारापासून दूर करू नका.. हात जोडते... पाया पडते मी तुमच्या...

बंटी : अशी काय करतेस ताई.. ये ना गं आमच्या जवळ.. ये ना .. ( बंटी आणि कोमलने तिचा हात पकडण्याचा प्रयत्न केला आणि जोरात किंचाळून त्यांनी हात झटकला ... घाबरून ते मागे झाले... एखादी वावटळ यावी तसे झाले आणि दरवाजा उघडला गेला..... बाहेर उभ्या असलेल्या बाबांना तिने मिठी मारली आणि रडू लागली... )

जोशी काकू : तुम्ही आधी माझ्या घरात चला.. इथून निघा आधी . (त्यांनी तिला जवळ घेतले. )

( गुरुजींनी पुढे होऊन दरवाजाला बाहेरून कडी लावली... काकूंनी तिला शॉल पांघरायला दिली ... बऱ्याच वेळाने ती सावरली.. घडलेला घटनाक्रम तिने जसाच्या तसा सांगितला. )

गुरुजी :त्या मुलांची आई नाही का दिसली तुला?

श्यामा : नाही .. ती मुले म्हणत होती कोणीतरी प्लँचेट द्वारे तिला बोलावले आहे ..

गुरुजी : म्हणजे ती लगेचच परत येईल... आता संध्याकाळ होत आलीय ... आपल्याला आजच रात्री त्या विहिरीजवळ जावे लागेल.. त्या मृतात्म्यांना मुक्ती मिळवून दिली पाहिजे... जितके जास्त दिवस ते ह्या योनीत राहतील तितकी त्यांची शक्ती वाढत जाईल... आणि श्यामाला वाचवणे आपल्याला अशक्य होईल...

( श्यामच्या घशाला घाबरून कोरड पडली .. ती उठून किचन मध्ये गेली ... पाणी पिता पिता तिचे लक्ष खिडकीकडे गेलं... आणि तिच्या हातातला ग्लास गळून पडला... एका स्त्रीची छाया तिच्याकडे रोखून बघत होती.. चेहरा दिसत नव्हता .. फक्त डोळे... तिच्यावर खिळलेले डोळे .. )

(ग्लास पडल्याचा आवाज ऐकून बाबा लगेच आत आले... श्यामाला खिडकीकडे घाबरून बघताना बघून त्यांनीही खिडकीकडे बघितलं .. पण त्यांना काहीच दिसलं नाही

" शमू... काय झालं गं ?.. अशी काय बघतेस खिडकीकडे ... चल बाहेर चल बघू"

गुरुजी : ( गंभीर होत ) काय झालं मुली

श्यामा : ती होती तिथे ...

गुरुजी : कोण?!"

श्यामा : त्या मुलांची आई...

नितीन : (घाबरून ओरडतो )का ss य .. (तो उठून आत गेला आणि खिडकीकडे पाहिलं.. तिथे कोणीच नव्हतं. ) कोणीच नाही तिथे.. ( बाहेर येत तो म्हणाला. )

श्यामा : (रागाने )मी खोटं बोलतेय असं वाटतंय का तुला ?

नितीन : नाही तसं कुठे म्हणालो मी.. आता तिथे नाही.. बस.. इतकेच.. ( गुरुजींनी त्याला नजरेनेच शांत राहायला सांगितलं . )

गुरुजी : श्यामाने तिला बघितलं हे खरं आहे.. ती आली होती.. मी आधीच म्हणालो होतो की ती लवकरच परत येईल ... आता जास्त वेळ दवडायला नको .. मी पूजेची तयारी करतो...

( तेवढ्यात जोशी काका आले .. बाबाना त्यांनी लगेच ओळखलं

जोशी काका : काय बोलता साहेब.. इतक्या वर्षांनी कसं येणं केलंत? ( बाबांनी त्यांना सर्व परिस्थिती सांगितली. ) ओह !! खूपच भयंकर आहे हे ... माझी काय मदत पाहिजे

ते सांगा .. श्यामा मुलीसारखीच आहे मला.. माझ्या मुलीवर  असा प्रसंग ओढवला असता तर मी मागे हटलो असतो का?.. आज इथेच मुक्काम करा तुम्ही.. आपण अड्जस्ट करू कसेही ..

बाबा : आभारी आहे तुमचा खूप... अवधूत तुला काही हवे असले तर सांग .. मी आणून देतो...

गुरुजी : त्याची गरज नाही.. सर्व तयारीनिशी आलो आहे मी.. कोणीही आता मी सांगितल्याशिवाय घराबाहेर पडू नका..

त्यांनी मिठाने सर्व घराच्या कॉर्नर्सला लाईन आखली . सर्वांच्या कपाळाला गंध लावले . )

( बरीच रात्र झाली होती.. सर्वजण जेऊन शांत बसले होते. )

गुरुजी :  आता 11 वाजलेत... आपल्याला विहिरीजवळ गेले पाहिजे .. 12 वाजायच्या आत पूजा पूर्ण झाली पाहिजे... ती पूर्ण शक्तीनिशी येईल... तिची ताकद आता खूपच वाढली आहे.. पण सर्वांवर अजूनही एक सर्वश्रेष्ठ ताकद आहे ... ती वाचवेल ह्या पोरीला ... जोशी साहेब तुम्ही इथेच थांबा .. फक्त श्यामा आणि तिचे वडीलच येतील सोबत.. नितीन तुही इथेच थांब ..

नितीन : नाही, मी पण येतो सोबत.. श्यामाला अशावेळी एकटं सोडणं बरोबर वाटत नाही .. मीही येतो... ( गुरुजींनी तिच्या वडिलांकडे बघितलं. त्यांनी हो म्हणून खुणावलं . )

गुरुजी :  ठीक आहे, ये तू पण... पण काहीही झालं तरी जागचे हलायचे नाही .. काहीही"

नितीन : ओके काका

( सर्वजण विहिरीजवळ आले.. आसपास चिटपाखरूही नव्हते .. मिट्ट काळोख .. विहिरीच्या तोंडावर लाकडे टाकून ती बंद केली होती .. पुन्हा तोच तो परिचित पाणवट स्पर्श .. श्यामाचे अंग शहारले .. गुरुजींनी खाली कापड अंथरले आणि त्यावर तिघांना बसायला सांगितले .. विहिरीपासून थोड्याच अंतरावर त्यांनी हवन सुरु केला .. एक एक चमचा तूप त्यात सोडायला सुरुवात केली... अखंड मंत्रोच्चाराने वातावरण भारून गेल्यासारखे झाले.. आणि काहीच वेळात वातावरणात बदल घडायला सुरुवात झाली.. श्यामाने नितीनचा हात गच्च पकडला . पाठोपाठ एक कर्णकर्कश किंकाळी हवेत विरली .. पाठोपाठ विहिरीवरची लाकडे दूर फेकली गेली आणि खिडकीत बघितलेली बाई विहिरीच्या कठड्यावर बसून रागाने त्यांच्याकडे बघू लागली... )

बाईचे भूत : थांबव हे सर्व .. मी माझ्या मुलीला घेऊन जाणारच.. तू काही पण कर...

( ती भेसूर हसू लागली... श्यामा रडू लागली .. नितीन आणि बाबानी तिचा हात थोपटून तिला धीर द्यायला सुरुवात केली. )

गुरुजी : ह्या भोळया मुलीचा नाद सोड .. ती आता तुझी मुलगी नाही.. कोण्या दुसऱ्याच्या पोटी तिने जन्म घेतलाय.. आणि तिथे ती सुखी आहे.. कसलाही त्रास तिला नाही

बाईचे भूत : तिने खूप त्रास सहन केलाय.. तिच्या बापाने तिला खूप मारलंय.. उपाशी ठेवलंय.. मोठी म्हणून तिच्याच वाटेला अधिक दु:ख आलंय.. म्हणून मीच तिची ह्या त्रासातून मुक्तता केली.. ( त्या भुताचे डोळे आता व्याकुळ झाले होते. )

गुरुजी : पण आता तिचा दुसरा जन्म झालाय .. आणि ह्या जन्मात तिचे आई वडील तिच्यावर खूप प्रेम करतात..

बाईचे भूत : मग माझे काय ? माझ्या मुलांचे काय ?

( एव्हाना ती दोन मुलेही विहिरीतून वर येत तिच्या बाजूला विहिरीच्या कट्ट्यावर येऊन बसली होती . ) आम्ही तिच्याशिवाय राहू शकत नाही.. तिच्यावर आमचा जीव आहे.. तिच्याशिवाय करमत नाही आम्हाला .. आमच्या चेहऱ्यावरचे हसू ती आहे.. आमचा आनंद ती आहे.. अठरा वर्षे तिची वाट पहिली आहे आम्ही.. माझा परिवार तिच्याशिवाय अपूर्ण आहे.. आम्हाला दुसरे काही नको.. फक्त ती हवी आहे.. हा एकांत आता असह्य होत आहे आम्हाला...

गुरुजी : पण तिला काय वाटतं हे तू का लक्षात घेत नाहीस .. तिला असे जबरदस्तीने तू घेऊन जाऊ शकत नाहीस.. तिला त्रास देऊन तुला काय मिळणार आहे.. "

बाईचे भूत : मी तिला त्रास देत नाही .. तिचा बाप द्यायचा... ( ती रागाने बोलली . )

गुरुजी : तू तरी दुसरे काय करते आहेस.. तिला मारूनच तर तिला घेऊन जाता येणार.. जिवंतपणे तर नाही ना? तिचा त्या जन्मीचा बाप फक्त फटके द्यायचा .. तू तर जीव घ्यायचा प्रयत्न करत आहेस.. कोण क्रूर हे तूच सांग...

( ती एकदम शांत झाली .. गुरुजी पूजा न थांबवता अविरत धूप, तूप अग्नीला अर्पण करत तिच्यावर ची नजर ढळू देत नव्हते .. ) हे बघ, मी तुला मुक्ती मिळवून देतो... ह्या योनीतुन मुक्त होशील तू आणि तुझी मुले..

बाईचे भूत : ही विहीर.. ही प्रचंड थंडी.... हा असह्य एकांत नको वाटत आहे आम्हाला .. ( ती कासावीस होते. )

गुरुजी : तू शांत हो... ह्या मुलीचा नाद सोड.. जगू दे तिला आनंदाने

(तिने श्यामाकडे बघितले.. श्यामाच्या नजरेतील भीती बघून ती दुःखी झाली...)

बाईचे भूत : मला एकदा तिला स्पर्श करू दे.. मग तू म्हणशील तसे होईल"

गुरुजी : ठीक आहे... जा ..

( ती कट्ट्यावरून उतरून हळूहळू श्यामाजवळ आली... तिच्या तोंडावरून प्रेमाने हात फिरवला .. चेहऱ्यावरून पीस फिरवल्यासारखे श्यामाला वाटले... एक क्षण तिच्याकडे बघून ती गायब झाली .. श्यामाने विहिरीकडे बघितले.. ती लहान मुलेही दिसत नव्हती.. विहिरीवर लाकडे पूर्ववत ठेवली गेली होती.. गुरुजींनी पुन्हा मंत्रघोष सुरु केला... पहाट होत आली होती आणि वातावरण आता हलके झाले होते.. पक्षांची किलबिल ऐकू येत होती... गुरुजींनी हसून सर्वांकडे बघितले ..

गुरुजी : आता सर्व ठीक आहे.. ती आता तुला कधीही त्रास देणार नाही... त्यांना मुक्ती मिळाली आहे.. आपण जाऊया आता घरी..

बाबांनी तिला प्रेमाने जवळ घेतले.. आनंदाने त्यांना रडू आवरले नाही.

*******************************

सगळेजण कॉलेजच्या कॅंटीनमध्ये बसले होते .. हास्यविनोद चालले होते...

नितीन : शमू, तशी तुझी त्या जन्मातली आई काही वाईट नव्हती.. किती प्रेम करायची तुझ्यावर...

श्यामा : हो ना .. तुलाही सोबत नेले असते मग मी ... शहाणाच आहेस .. कितीही झाले तरी भूतच ते...

नितीन : मस्करी केली ग तुझी.. पण काहीही म्हण... खूप जीव होता तुझ्यावर तिचा .. तिची नजर बघितलीस.. किती प्रेम होते त्या नजरेत.. किती व्याकुळ झाली होती ती तुला स्पर्श करताना.. इतकाही जीव असू शकतो का कोणावर की त्याला घेऊन जायला दुसऱ्या जन्मातही येता येतं?!!

श्यामा : may be ...

नितीन : ए, तू समजा मेलीस... ( तिने दाणकन त्याच्या पाठीत एक गुद्दा ठेऊन दिला .. ) आई ग... किती मारतेस.. अगं समजा तू इच्छा अपूर्ण असताना मेलीस तर कोणाला सोबत नेशील?( तो हसत म्हणाला . तशी तीही हसू लागली )

श्यामा : तुला

नितीन : मला !! ते का ?

श्यामा : (भावुक होत) कारण सगळ्यात जास्त मी तुझ्यावर प्रेम करते .. अगदी माझ्या आई वडिलांपेक्षा जास्त .. तुझ्याशिवाय जगण्याची कल्पनाच मला सहन होत नाही... त्या आईच्या भावना आता समजू शकते मी... प्रेम असावे तर असे...

नेहा : नितीन सांभाळून रे बाबा .. हिला जिवंत ठेवणे आता तुझी जबाबदारी आहे .. ( नेहा हसत बोलली आणि सगळेच हसू लागले. )

---

श्यामा : गुड नाईट आई .. गुड नाईट बाबा ( श्यामाअंगावर चादर घेत बोलली . )

बाबा : गुड नाईट बेटा

( श्यामाने खिडकीकडे बघितले .. स्वच्छ चांदणे पडले होते. तिच्या चेहऱ्यावर हसू उमटले.. शांतपणे तिने डोळे मिटले... मध्यरात्र झाली होती .. अचानक थंडी भरून आली म्हणून श्यामाने चादर अंगाभोवती गच्च लपेटली .. तरीही थंडी जाईना.. बर्फासारख्या गार पाण्यात झोपलो आहोत असा भास तिला झाला आणि तिने खाडकन डोळे उघडले .. किंचाळायला तिने तोंड उघडले आणि तिच्यावर ओणव्या झालेल्या त्या स्त्रीचा हात तिच्या तोंडावर पडला )

बाईचे भूत : शू ss चल मी तुला न्यायला आलेय ... तो गुरुजी मूर्ख आहे... माझी ताकद त्याने ओळखलीच नाही ... चल .. ती बघ, तुझी भावंडे तुझी वाट बघताहेत ...

( श्यामाचे डोळे हळूहळू मिटू लागले... थंडी हळूहळू कमी होऊ लागली.. शरीर हलके होऊ लागले... आणि ... तिने डोळे उघडले तेव्हा तिची दोन्ही भावंडे हसत तिच्या दिशेने हात पसरून झेपावत होती... ती आता विहिरीत होती. )

( नितीनच्या होस्टेलची रूम..... त्याचा रूममेट त्याला थोड्याच वेळात येतो म्हणून जातो .. नितीन ड्रॉवरमधून श्यामाचा फोटो काढतो .. त्याच्या डोळयातून अश्रू वाहतात )

नितीन : शमू ... माय लव्ह,, ( तो हुंदके देत रडू लागतो.. ) हे काय होऊन बसले गं शमू ?( तिच्या फोटोवर ओठ टेकवतो... इतक्यात जोराच्या वाऱ्याने खिडकी उघडली जाते .. त्याने उठून खिडकी बंद केली आणि वळतो.. भयाने त्याचे डोळे विस्फारले जातात.. बेडवर श्यामा त्याच्याचकडे हसत बघत बसलेली असते.. ती त्याच्या दिशेने हात फैलावत झेपावते.. आणि एका किंकाळी पाठोपाठ त्याच्या भयाने विस्फारलेल्या डोळयावर कॅमेरा स्थिरावतो.. )

---------------------------समाप्त ----------------------------

लेखिका : सुषमा कृष्णा जाधव

पत्ता : 605/ बी विंग, ट्युलिप रेसिडेंसि, ताराबाई पार्क, कारंडे मळा, सर्किट हाऊसच्या मागे, कोल्हापूर

मोबाईल नं. 8652547769

# ई साहित्य प्रतिष्ठान

**मराठी** भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला चाळीसेक लाख डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.

"Language is the blood of the soul into which thoughts run and out of which they grow."

– Oliver Wendell Holmes

www. esahity. com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail. com ला कळवून मेलने मिळवा.

किंवा7710980841हा नंबर सेव्ह करून या नंबरला तुमचे नांव व गांवWhatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा.

किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहे. तेdownload करा.

हे सर्व मोफ़त आहे.